प्रकरण क्र. ३

# ‘विच्छा माझी पुरी करा’ या नाट्यकृतीचा अभ्यास

## प्रकरण क्र. ३

# 'विच्छा माझी पुरी करा' या नाट्यकृतीचा अभ्यास

' 'तमाशा'हा अस्सल मराठी आहे असे आपण म्हणतो तेव्हा त्याचा अर्थ, त्याची जडणघडण, आकार, स्वरूप हे मराठी मनाच्या गरजांप्रमाणे निर्माण होत आले आहे असा आहे. तमाशाला लोकनाट्य म्हणून त्याच्यावर सुसंस्कृतपणाचा अभ्रा चढविला जातो. असा आरोप काही लोक करतात पण वगप्रधान तमाशालाच लोकनाट्य म्हटले जाते. वगात नाट्य असावेच लागते आणि लोककथेतील हे नाट्य म्हणून त्याला लोकनाट्य म्हणणे अधिक समर्पक वाटते. त्यात तमाशाचे सुसंस्कृतीकरण करण्याचा प्रश्न नाही.'[१] लोकनाट्याच्या बाबतीत अनेक लोकांची अनेक मते आहेत. कुणी म्हटले लोकनाट्य म्हणजे नाट्यवेष परिधान केलेला तमाशा, कुणी तमाशाचा नाट्यविष्कार तर कुणी मुक्तनाट्य, वगनाट्य म्हटले आहे. खरे पाहता 'रशियन भाषेत 'पीपल्स थिएटर' म्हटले गेले त्यावरून लोकनाट्य हा शब्द तयार झाला असावा.'[२] मराठी लोकरंगभूमीवर या वगनाट्यांना प्रचंड लोकप्रियता मिळाली कारण या वगनाट्यांमध्ये मराठी माणसाला अपेक्षित असणारा रांगडेपणा आणि साधेपणा थोडासा चावटपणाही मिळतो. त्यातील हजरजबाबीपणा तर मराठी माणसाच्या जिव्हाळ्याचा विषय. आणि या हजरजबाबीपणाची भूक भागविण्याचे सामर्थ्य मराठी लोकरंगभूमीवरील फार थोड्या वगनाट्यात आहे. त्यापैकी सर्वात लोकप्रिय वगनाट्य म्हणजे वसंत सबनीस यांचे 'विच्छा माझी पुरी करा' प्रस्तुत वगनाट्याने मराठी रंगभूमीवरील लोकनाट्य तमाशात आमुलाग्र बदल घडवून आणला. आदर्श वगनाट्याची संकल्पना समस्त भारतभूमीला दाखवून दिली. या 'विच्छा माझी पुरी करा' या वगनाट्याचा अभ्यास प्रस्तुत प्रकरणात करावयाचा आहे.

## अ) लेखक परिचय -

वसंत सबनीस यांचे मूळ नाव 'रघुनाथ दामोदर सबनीस' असे असून, त्यांचा जन्म दि. ६ डिसेंबर १९२३ रोजी सोलापूर येथे झाला. त्यांचे प्राथमिक शिक्षण लोकमान्य हायस्कूलमध्ये झाले. पुणे येथील फर्ग्युसन महाविद्यालयात १९४६ साली ते बी. ए. झाले. त्यांनी शासकीय नोकरीही केली होती. सबनीसांनी आपल्या लेखनास आरंभ केला तो कवितेने 'अभिरूची'तून त्यांच्या कविता प्रकाशित झाल्या. पण ते ललित विशेषत: विनोदी लेखनाकडे वळले व त्या लेखनाने त्यांना भरपूर लोकप्रियता मिळवून दिली.

पानदान (१९५८ ललितलेख), चिल्लर खुर्दा (१९६०), भारूड (१९६२), मिरवणूक (१९६५), पंगत (१९७८), आमची मेली पुरूषाची जात (२००१) असे विनोदी लेख.

खांदेपालट (१९७२), पखाल (१९७७), आत्याबाईला आल्या मिशा (१९८५), थापाड्या (१९८५), विनोदी द्वादशी (१९८८), बोका झाला संन्यासी (२००१) असे काव्यसंग्रह.

सोबती (१९९२) हा व्यक्तिचित्रसंग्रह. माहेश्वरी (१९८८) हा आत्मपर लेखांचा संग्रह.

निळावंती (१९६३), माझे घरटे माझी पिले (१९६८), म्हैस येता घरा (१९६९), सौजन्याची ऐशी तैशी (१९७५), मेजर चंद्रकांत (१९७७), नाटक (१९७७), घरोघरी हीच बोंब (१९७७), मामला चोरीचा (१९८६), कार्टी श्रीदेवी (१९८८), गेला माधव कुणीकडे (१९९४) अशी रंगभूमीवर गाजलेली नाटके.

प्रेक्षकांनी क्षमा करावी (१९६१) चिलखतराज जगन्नाथ (१९७१), बिन माणसाचा हात (१९६५), यम हरला यम जिंकला असे एकांकिका संग्रह. गुदगुल्या आणि परसूच्या पशुकथा हे बालकथासंग्रह.

नील सायमन यांच्या 'आय ॲट टु बी इन पिक्चर्स' या नाटकाचा स्वैर अनुवादही त्यांनी केला आहे.

विनोदी लेखक, नाटककार, संपादक, पटकथाकार, पटकथा लेखक असणाऱ्या या

माणसाने लोकनाट्य अथवा वगनाट्य हा लेखनप्रकार फार उशिरा हाताळला. तरी त्याची बीजे त्यांच्या शालेय जीवनात पेरली गेली होती. त्यांचे शालेय शिक्षण पंढरपूर या तीर्थक्षेत्री झाले. तेथील वारकरी संप्रदायाच्या वातावरणात खरे तर ते संत व्हायला हवे होते. पण संत न होता वसंतच राहिले आणि अभंग न लिहिता तमाशा लिहायला लागले. त्यांचे वडील त्यावेळी कराड येथे एकटेच राहत होते आणि ते मामलेदार कचेरीत ट्रेझरी क्लार्क होते त्यांना तमाशाचा शौक होता. त्यांनी ग्रामोफोन घेतलेला होता. खूप रेकॉर्डसही जमवल्या होत्या. त्यातील बऱ्याच रेकॉर्डस् लावण्यांच्या आणि तमाशातील संवादांच्या होत्या. दर उन्हाळ्याच्या सुट्टीत लेखक त्यांच्याकडे जात असे. तेथे गेल्यानंतर त्यांना वडिलांनी लपवून ठेवलेल्या त्या रेकॉर्डस् सापडल्या त्यावर लावण्यांची नावे होती. 'बाई म्या शेज फुलांची केली,' 'तुम्ही माझं सावकार', 'कुठंवर पाहू वाट जिवलगा', 'माथ्यावर चंद्र की ग ढळला', वगैरे ही काय भानगड आहे? हे पाहण्यासाठी त्यांनी त्या रेकॉर्डस् लावल्या. त्यांचा ढोबळ अर्थही त्यांना कळला आणि त्या कानाला गोड वाटू लागल्या. त्यातच काही तमाशातील संवादही होते. ते थोडेसे चावट होते पण ते ऐकताना गंमत वाटत होती. ते प्रवाही होते आणि लवचिक होते. शब्दांवरील कोट्या गमतीशीर होत्या. लेखक रोज त्या रेकॉर्डस् लावून ऐकत असे.

पुढे पंढरपूरच्या काही मित्रांबरोबर एक-दोनदा लेखक तमाशाला गेले. कॉलेजला पुण्यात असताना विजयानंद थिएटरातही थोडे तमाशे पाहिले. पुढे अनेक वर्षांनी पंढरपूरच्या मंदिराच्या आसपास उत्पातांची लावण्यांची मैफील दरवर्षी जमते हे समजले आणि देवाला लावणीचे वावडे नाही हे त्यांच्या लक्षात आले.

१९५४-५५ साली सबनीस मुंबई सरकारच्या प्रसिद्धी विभागात उपसंपादक म्हणून काम करीत होते. त्यावेळी कविता, श्रुतिका वगैरे लेखन करुन धडपड चालू असतानाच श्री. उमाकांत ठोमरे यांच्याशी स्नेह जुळला त्यावेळी ठोमरे 'वीणा' हे मासिक चालवित असत. मुंबई सरकारने त्यावेळी दारूबंदीची जोरदार मोहीम हाती घेतली होती. आणि ठोमरे यांना 'वीणा' चा दारूबंदी विशेषांक काढण्याची विनंती केली होती. एके दिवशी त्यासंबंधी चर्चा

करताना ठोमरे यांनी सबनीसांना काही लिहितोस का म्हणून विचारले. सबनीसांनाही तमाशासारखे संवाद लिहिण्याची इच्छा होती. त्यासाठी ही संधी चांगली वाटली आणि त्यांनी आपला पहिला वग लिहिला. त्याचं शीर्षक होतं 'खणखणपूरचा राजा' छोटीशी गोष्ट. लवचिक संवाद, शाब्दिक कोट्या यांचा वापर करून लेखकाने तो वग लिहिला. अनेकांना तो आवडला. त्याआधी सबनीसांनी राष्ट्रसेवादलाची लोकनाट्ये पाहिली होती. त्याचेही संस्कार ह्यावर होते. निळू फुले यांच्या मागणीनुसार 'समदा गाढवाचा गोंधळ' हे लोकनाट्य लिहिले.

श्री. उमाकांत ठोमरे यांनी 'वीणा' मासिकाचा आकार मोठा केला. खास दिवाळी अंक काढण्यास सुरवात केली. आणि त्यांचा व सबनीसांचा एक अलिखित करार झाला व त्याप्रमाणे दरवर्षी 'वीणा' च्या दिवाळी अंकासाठी सबनीसांनी एक वग लिहावा असे ठरले. त्यानुसार सबनीसांनी 'निळावंतीचा वग', 'छपरी पलंगाचा वग' 'आदपाव सुतार पावशेर न्हावी सव्वाशेर शिंपी' असे वग लिहिले पुढे 'वीणा' बंद झाल्यावर 'आवाज' वार्षिकासाठी सबनीस वग लिहू लागले. 'बाई बुवा आणि पैज,' 'त्रिशूलाचा वग' इ. वग त्यांनी लिहिले.

वसंत सबनीस यांनी लिहिलेल्या उपरोक्त लोकनाट्यात अथवा वगनाट्यात १९६१ साली 'वीणा' मासिकातून 'छपरी पलंगाचा वग' या शीर्षकाने प्रथम प्रकाशित झालेल्या आणि नंतरच्या काळात 'विच्छा माझी पुरी करा' या नावाने प्रसिध्दीस पोचलेल्या या वगनाट्याने, समाजमनावर अधिराज्य गाजविले. प्रेक्षकांना आकर्षित करुन स्वतःचे स्वतंत्र स्थान निर्माण केले.

## ब) संविधानक / कथावस्तू -

संविधानक / कथावस्तू हा साहित्यकृतीचा आत्मा असतो. संविधानकाशिवाय कोणतीच साहित्यकृती अस्तित्वात येणे अशक्य असते. प्रतिभेच्या जोरावर किंवा कल्पनेने एखादी कथावस्तू प्रतिभावंतास स्फुरते आणि नंतर ती प्रत्यक्षात अवतरते. या कथावस्तूच्या अनुषंगाने कलाकृतीतील पात्रे, घटना, प्रसंग, संघर्ष परिणामकारकता संवाद, भाषाशैली इ.

अनेक गोष्टी आकारास येतात. एखादी घटना लेखकाच्या मनावर परिणाम करते त्याच्या कल्पनाशक्तीस किंवा प्रतिभेस आव्हान देते त्यातून लेखकाचे विचारचक्र सुरू होते आणि कलाकृतीची निर्मिती प्रक्रिया घडते. कथानक जनमानसावर किती प्रमाणात परिणाम करते. त्याला विचार प्रवृत्त किंवा अंतर्मुख करते किंवा त्याचे कशा प्रकारे मनोरंजन करते यावर त्या साहित्यकृतीचे यश अवलंबून असते.

कथाबीज हा नाट्याच्या बाबतीत अतिशय महत्त्वाचा घटक होय. नाट्यनिर्मिती होत असताना प्रथम नाट्यसूत्र स्फुरते त्या सूत्रानुसार गोष्ट सुचते आणि गोष्टीतून नाट्याचे संविधानक **(Plot)** तयार होते. मनुष्यस्वभावानुसार अनेक प्रसंग एकमेकात गुंफले गेले म्हणजे गोष्ट निर्माण होते. नाटककाराला हीच गोष्ट नाट्यमाध्यमातून सांगावयाची झाली तर ती कशी सांगायची हे ठरविताना गोष्टीचे संविधानकात अथवा कथानकात रूपांतर होत असते. वगनाट्यात प्रस्तुत कथानक स्थिर असले तरी पात्रांच्या तोंडचे संवाद मात्र लवचिक असतात. त्यातूनही ऐनवेळी कथेत एखाद्या प्रसंगाची भर पडण्याची शक्यता नाकारता येत नाही आणि वगनाट्याच्या प्रयोगाची लांबी वाढण्याचीही शक्यता असते.

'विच्छा माझी पुरी करा' या वगनाट्याची सुरवात भारतीय संस्कृतिला अनुसरून आद्यपूजेचा मान असणाऱ्या विघ्नहर्त्याच्या नमनाने म्हणजेच गणेशाचे नमन करणाऱ्या गणाने होते.

**गण -**

हे शुभवदना सांबनंदना आद्य पूजेचा मान तुवा
रंग जमू दे दंग होऊ दे सकल कलांचा तू ठेवा ॥
नाद सुरांचा छंद लागला वाद्यमेळ हा घुमे आगळा
तव गानी नटसंच रंगला विघ्न हराया ये देवा ॥
ओंकारातून ब्रह्म निघाले तालसुरावर नाचू लागले

संत थोरही येथे रमले सकल कलांचा तू ठेवा ॥

या गणाच्या माध्यमातून प्रयोगावेळी येणारी सर्व विघ्ने दूर करून प्रयोगात चांगला रंग जमू दे आणि रसिक तल्लीन होऊ दे, मंत्रमुग्ध होऊ दे अशी गणपतीला प्रार्थना करतातच सोबत शंकरालाही नमन केल्याचे आढळते.

**गवळण -**

गणेशाचे नमन केल्यानंतर वगनाट्याच्या परंपरेला अनुसरून गवळण सादर होते. गवळणीमध्ये श्रीकृष्ण आणि पेंद्या मथुरेला जाणाऱ्या गवळणींना अडवून त्यांची आणि मावशीची चेष्टा मस्करी करतो. त्यांच्याकडून आपला टॅक्स म्हणजेच दूध, दही, लोणी तर घेतोच शिवाय आपले अस्सल दान म्हणजे गवळण झाल्यानंतर कृष्ण सर्व गवळणींना मथुरेस जाण्याची परवानगी देतो. नंतरच्या काळात या वगनाट्यातून गवळणीचा भाग काढून टाकण्यात आला.

'विच्छाचे सुमारे ५० प्रयोग झाल्यानंतर तमाशा कसा असावा व कसा असू नये हे सांगणारी बतावणी सबनीसांनी लिहिली. बतावणीपूर्वी 'विच्छा'त मुंबईची लावणी घेतली जात ती सुमारे १ तास चालत असे. हवालदार गावातून मुंबईला परत निघाला असताना त्याची कारभारीण त्याच्याबरोबर मुंबईला यायचा हट्ट करते, तेव्हा तो मुंबईचं वर्णन करतो. या प्रसंगात दादा कोंडके यांनी ती लावणी तयार केली होती तीच सादर केली जात असे.'[३]

**बतावणी -**

ऑक्टोबर १९६५ मध्ये दामोदर हॉलला 'विच्छा माझी पुरी करा'चा एक प्रयोग झाला त्यानंतर एकदा सबनीस स्वत:शी विचार करीत असताना बतावणीची कल्पना त्यांच्या डोक्यात आली. त्याचा निश्चित आराखडा डोक्यापुढे नव्हता पण 'लेखक आणि शाहीर यांची अचानक रस्त्यात गाठ पडली आणि त्यातून नवा वग बसविण्याची चर्चा झाली तर काय होईल ?' शिवाय तमाशाबद्दलच्या माझ्या काही कल्पना व विचार होते तेही यातून मांडता

येतील का?'[४] असा विचार करून सबनीसांनी बतावणी लिहायला घेतली.

लेखक आणि शाहीर यांच्यातील संवादातून आदर्श लोकनाट्य कसे असावे याचे वर्णन केले आहे. महाराष्ट्राचे लोकनाट्य हे महाराष्ट्राच्या संस्कृतीला अनुसरणारे असावे त्यात वाईट वंगाळ अचकट विचकटपणा, शिव्या, शाप नसावेत. लोकनाट्यात शृंगार आणि विनोदाचे तारतम्य पाळलेले असावे. शृंगार आणि विनोद हा अश्लिलतेकडे झुकणारा नसावा हे घरंदाज रूपवान नारीशी लोकनाट्याची तुलना करून पटवून दिले आहे. ही बतावणी इतकी प्रभावी ठरली की, वगनाट्यात गवळणीची गरजसुध्दा भासली नाही.

नाटकाच्या सुरवातीलाच वगनाट्याच्या कथानकाचा पूर्वसंकेत देणारी पद्यरचना म्हणजेच शिलकार / कटाव / टाकणीची लावणी सादर होते ती पुढीलप्रमाणे -

सूर्यपूर नगर पाच मैलांचा हो घेर
तिथं राज्य करी राजा एक थोर
नाव होतं त्याचं राजा रणधीर
भोळा भाबडा होता स्वभाव त्याचा फार
तिथं झाला काय परकार, सांगतो सार, ऐका तुम्हालाऽऽऽ
राज्यात गोंधळ भारी, चाले खरोखरी, खबर नाही त्याला ॥ जी

सूर्यपूर नगराच्या राजास आपल्याच नगरीत / राज्यात चालणारा सावळा गोंधळ माहीत नाही कारण राजा रणधीर हा भोळा भाबडा स्वभावाचा आहे. आणि त्याच्या या भोळ्या स्वभावामुळे काय घटना घडतात याचे प्रत्यंतर पुढील वगात येते आणि प्रेक्षकांची उत्सुकताही ताणली जाते.

सोबतच मूळ महारी लावणीचा ढंग नेमकेपणाने प्रकट झाल्याचे दिसते. उंच हाळी देऊन म्हणण्याची धाटणी शेवटच्या दोन ओळीतील बदल आणि त्यामुळे आरोह आवरोहासह सारी वैशिष्टये उपरोक्त लावणीतून प्रकट होताना दिसतात.

वास्तविक 'विच्छा माझी पुरी करा' या वगनाट्याचे पूर्वीचे नाव 'छपरी पलंग' १९६१ च्या दिवाळी अंकासाठी 'वीणा' मासिकाने वसंत सबनीसांना वग लिहिण्याची विनंती केली. ती सबनीसांनी मान्य केली पण त्यांना कथा सुचेना. श्री. ठोमरे यांचे तगादे सुरू झाले. लेखक बेचैन झाले. पण कथेची अडचण काही दूर झाली नाही. तेवढ्यात सबनीसांच्या एक मित्राने त्याच्या फजितीची गोष्ट सबनीसांना सांगितली ती पुढील प्रमाणे 'त्याने चाळीतील स्वत:च्या घराच्या चौकटीचे मोजमाप न घेता स्वस्त मिळाला म्हणून डबलबेड पलंग खरेदी केला आणि शेवटी तो मोडतोड करून घरात नेला.' यावरून सबनीसांना प्रस्तुत कथा सुचली या कल्पनेतूनच हे वगनाट्य सिद्ध झाले.

राजा हवालदाराजवळ प्रधानजींची चौकशी करतो तेव्हा प्रधानजी स्वत:च्या पत्नीच्या बाळंतपणासाठी मॅटर्निटीत गेल्याचे हवालदार सांगतो. प्रधानजींच्या आगमनानंतर राजा राज्याची हालहवाल विचारतो. राज्यात चोऱ्या, खून, पाऊसपाणी कसे काय आहे यासंबंधी राजा विचारपूस करतो एकूण राज्यात भरभराट असल्याने स्वत: शिकार खेळायला जाण्याचा मानस राजा व्यक्त करतो. सर्व लवाजम्यासोबतच दोन शिकारी कुत्री सोबत घेण्याचे आदेश राजा देतो. हवालदार सांगतो एक कुत्रा आजारी असल्याने तुम्ही प्रधानजींना सोबत न्या. कारण त्यांना जंगलाची पूर्ण माहिती आहे. पण प्रधानजी सोबत येण्यास नकार देतात कारण राज्याचा कोतवाल अत्यवस्थ/ आजारी असतो ही बातमी राजास समजताच राजा आश्चर्यचकित होतो आणि त्याच्या तब्येतीची विचारपूस आणि काळजी घेण्यास सांगतात आणि हवालदारास त्यांची बातमी काढण्यासाठी पाठवतात. राजा आणि प्रधान कोतवालाविषयी चर्चा करत असतानाच शिपाई कोतवाल मरण पावल्याची खबर घेऊन येतो. राजा दु:खी होतो आणि कोतवालाच्या घरी काही हवं नको याची चौकशी करा, अंत्ययात्रा शाही इतमामानं काढा. त्यांना पाच तोफांची सलामी द्या आणि चांगल्या माणसाची त्याच्या जागी नेमणूक करा असा प्रधानजींना आदेश देतो आणि शोक करण्यासाठी जनानखान्यात निघून जातो.

राजा गेल्यानंतर शिपाई आणि प्रधान यांच्यात कोतवालाच्या जागी कोणाची नेमणूक

करायची याविषयी चर्चा होते. शिपाई हवालदाराच्या बढतीविषयी विचारतो तर प्रधान स्वत:च्या मेव्हण्याच्या (आप्पासाहेबांच्या) नेमणुकीचा विचार बोलून दाखवितो आणि हवालदाराला गाठून कोतवालाच्या अंत्ययात्रेची तयारी करण्यास शिपायास पाठवितो.

कोतवालाच्या तब्येतीची बातमी घेण्यासाठी गेलेला हवालदार मैनावतीच्या घरी असल्याने शिपाई मैनावीच्या घरी जातो. हवालदार मैनावतीला मी कोतवाल झाल्यानंतर तुझ्याशी लग्न करेन असे समजावून सांगत असतो. आणि कोतवाल मरावा म्हणून आपण मारूतीला नवस केल्याचे सांगतो तेव्हा शिपाई कोतवाल मरण पावल्याची खबर घेऊन येतो. हवालदार आनंदी होतो आणि मैनावतीस उद्या लग्न करण्याचे आश्वासन देतो. आणि शिपायाला घेऊन कोतवालाच्या अंत्ययात्रेच्या तयारीसाठी निघून जातो. अंत्ययात्रेस वेळ असल्याने हवालदार आणि शिपाई हॉटेलात शिपायाच्या पैशाने नाष्टा करून बाहेर पडतात. आणि हवालदार स्वत:च्या ड्रेस शिवण्यासंदर्भात शिपायास सांगतो तेव्हा शिपाई त्याला सांगतो की, प्रधानाचा मेव्हणा कोतवाल होणार आहे. तेव्हा वशिलेबाजीने होणाऱ्या या कोतवालाला सहा महिन्यात खडी फोडायला पाठविण्याचा हवालदार चंग बांधतो. शिपाई त्याला मदत करण्याचे आश्वासन देतो.

नवनियुक्त कोतवाल हजर होताच हवालदार आणि शिपायाची ओळख करून घेतो. स्वत:चे आणि त्यांचे काम समजावून घेतो. हुद्दा समजावून घेतो आणि हवालदार आणि शिपायाकडे रेडू म्हणजेच रेडिओची मागणी करतो. तेव्हा हवालदार त्याला रेडिओ ऐकण्यापेक्षा प्रत्यक्ष बाई समोर गात असताना गादीवर बसून गाणं ऐकायचं असतं असे सांगतो. तेही मध्यरात्रीनंतर कारण त्यामुळे आपली बदनामीही होत नाही आणि गाणंही चांगलं वाटतं. हे सांगून मैनावतीकडे जाण्याची शिफारस करतो.

मैनावतीकडे हवालदार झालेला सर्व प्रकार सांगण्यासाठी येतो, तेव्हा ती लग्नानंतर नाचगाणे बंद करणार नाही म्हणून सांगते. तेव्हा हवालदार तिला सांगतो की माझे प्रेम तुझ्या कलेवर आहे. आणि नंतर सांगतो की आपल्या नव्या कोतवालास नाचगाण्याचा लई शौक

आहे. तेव्हा तू त्याला आपल्या जाळ्यात ओढ. कारण त्याला खडी फोडायला घालवण्याचा हाच एक मार्ग आहे. त्याला लांबून गार कर हे सांगायला तो विसरत नाही.

कोतवाल मैनावतीच्या घरी जातो तेव्हा त्याचा सामना मैनावतीच्या घरचा हरकाम्या सख्याशी (छक्का) होतो. आणि तो बेशुद्धच पडतो. मैनावतीची कोतवालाशी ओळख झाल्यानंतर तो मैनावतीच्या जाळ्यात पुरता अडकतो. आणि ती स्वत:चा प्रत्येक हट्ट पूर्ण करवून घेण्यात यशस्वी होते. मैनावती त्याला राजाचा कंठा, अंगठी, राजमुद्रा यासारख्या मौल्यवान वस्तू मागून घेते आणि कोतवाल त्या आणून देतो तरी राजाला त्याची खबर लागत नाही. म्हणून हवालदार हवालदिल होतो आणि चिंतेत पडतो की, कोणती वस्तू कोतवालाने चोरल्यास राजाच्या पटकन निदर्शनास येईल आणि मैनावती राजाचा छपरी पलंग चोरण्याचे सुचवते. त्यानुसार हवालदार आणि शिपाईसुध्दा याला अनुमोदन देतात आणि मैनावती कोतवालाकडे राजाचा छपरी पलंग आणून द्या म्हणून हट्ट धरते. कोतवाल तोसुध्दा हट्ट हवालदार आणि शिपायाच्या मदतीने पूर्ण करतो एवढेच नव्हे तर प्रधान आणि कोतवाल मिळून राजाला हा छपरी पलंग भूताच्या वाड्यात आपल्या दिवंगत वडिलांच्या भूताने नेलेला असावा हे पटवून देण्यातही यशस्वी होतात. पण हवालदार राजास सांगतो की, तो छपरी पलंग कोतवालानेच चोरला आहे. आणि आपणास प्रमाण हवे असेल तर आपण आपल्या पूर्वजांप्रमाणे वेशांतर करून उद्या भूताच्या वाड्यात या आणि कोतवाल मैनावतो तुला कशी मिळाली? ते विचारा. तेव्हा मात्र राजाला कोतवालाच्या कारभारावर संशय येऊ लागतो आणि आपले राज्यकारभारात दुर्लक्ष झाल्याचे समजते.

दुसऱ्या दिवशी भूताच्या वाड्यात कोतवालाच्या लग्नात राजा भटजीचा वेष घेऊन येतो. लग्न लावतो आणि 'मैनावतीसारखी देखणी नृत्यगायनात कुशल स्त्री' कशी मिळाली ? असे विचारतो तेव्हा कोतवाल अभिमानाने मैनावतीचा 'राजाचा छपरी पलंगाचा हट्ट' तोही चोरून आणून पूर्ण केला. आणि राजा बावळट असल्याने त्याला काहीच समजले नाही असे सांगतो. तेव्हा राजा कोतवालास अटक करण्याचा आदेश देतो. कोतवाल माफी मागू लागतो

त्यावेळी कोतवालाचे लग्न मैनावतीऐवजी सख्याशी लावलेले असल्याने सख्याला पाहून कोतवाल मात्र 'मला फासावर चढवा, हत्तीच्या पायी द्या... पण हे लफडं नग...' म्हणून राजाला विनवतो पण राजा कोतवालास सख्यासोबत संसार करण्याची शिक्षा देतो आणि हवालदाराच्या कामगिरीवर खुष होऊन राजा त्याला कोतवालीची वस्त्रे देतो आणि हवालदार मैनावतीला घेऊन राजाचा आशीर्वाद घेतो.

## क) व्यक्तिरेखा -

कोणत्याही नाट्याच्या संहितेत प्राण ओतण्याचे काम या व्यक्तिरेखाच करत असतात मुळात नाटक हे व्यक्तिरेखांच्या आधारे लिहिले जाते किंबहुना लिखित नाट्य रंगमंचावर आणण्यासाठी त्यात पात्रांच्या अनुषंगाने अनेक बदल करावे लागतात. वगनाट्य हे पूर्णत: तोलामोलाच्या पात्रांवरच अवलंबून असते. किंबहुना पात्रांच्या हजरजबाबीपणा, प्रसंगावधान, संवादातील लवचिकता, यामुळेच वगनाट्य प्रेक्षकांच्या अथवा रसिकांच्या चिरकाल स्मरणात राहत असते म्हणून वगनाट्यात पात्रांना/ व्यक्तिरेखांना अनन्यसाधारण महत्व असते. अनेक वगनाट्यामुळे अनेक व्यक्तिरेखा साकारणाऱ्या कलावंतांना आपले स्वत्व गवसले आहे. अनेक वगनाट्यांनी महाराष्ट्रातील अनेक कलावंतांना विस्मृतीच्या अंधारातून प्रकाशात आणले अमाप पैसा, प्रतिष्ठा व प्रसिद्धी प्राप्त करून दिली म्हणूनच वगनाट्याच्या कथेप्रमाणेच व्यक्तिरेखांना महत्वाचे स्थान असते.

'विच्छा माझी पुरी करा' या वसंत सबनीस लिखित वगनाट्यामध्ये हवालदार, शिपाई, मैनावती, कोतवाल, प्रधान, राजा आणि सख्या अशा व्यक्तिरेखा आहेत.

### हवालदार -

हवालदार ही या वगनाट्यातील नायकाची भूमिका होय. संपूर्ण वगनाट्य हवालदाराभोवती फिरते. हवालदाराच्या कोतवाल होण्याच्या आकांक्षेतून घटनांची साखळी निर्माण होते आणि वगनाट्याचे कथानक गती घेते.

रंगमंचावर राजाच्या मागून हवालदार प्रवेश करतो, आणि राजाचे पाय धरून थांबवून, त्यांना मुजरा करतो. प्रधानजी सध्या कुठे आहेत यापासून ते राजा सासरवाडीला कशासाठी गेला होता, यापर्यंतच्या सर्व गोष्टींवर त्याची बारीक नजर आहे. प्रधानजी राज्याची प्रजा कशी वाढवतात आणि परप्रांतातील लोक कसे आपल्या राज्यात येऊन श्रीमंत होतात याचेही यथार्थ स्पष्टीकरण देण्यास तो समर्थ आहे. राज्यात सर्वकाही व्यवस्थित आहे. हे तो राजाला पटवून देतो त्यामुळे राजाने शिकारीसाठी कायम जंगलात असावे असेही तो राजाला सुचवितो. आणि शिकारीला सोबत पाच सात तोफा अन् दोन चार रणगाडे नेण्याची शिफारस करून राजाला पॅटन रणगाड्यांची माहिती देतो. तसेच राजा दोन शिकारी कुत्रीबरोबर घेण्यास सांगतो तेव्हा हवालदारच राजाला तुमचा एक शिकारी कुत्रा आजारी असल्याने तुम्ही प्रधानास सोबत घेऊन जावा, कारण त्यांना जंगलाची माहिती आहे असे सुचवितो.

राज्याच्या कोतवालांना डॉ. लागू यांचे औषध चालू असल्याचेही हवालदार राजाला सांगतो. हा कोतवाल मेल्यानंतर सेवाज्येष्ठतेमुळे हवालदारच कोतवाल होणार असतो आणि कोतवाल झाल्याशिवाय तो मैनेसोबत लग्न करू शकणार नसल्याने कोतवाल लवकर मरावा असे त्याला मनोमन वाटत असते. कोतवाल मरावा म्हणून त्याने मारूतीला नारळही फोडलेला आहे. राज्यकारभारातून थोडासा वेळ मिळाला की, हवालदार मैनावतीच्या घरी हजर होतो. मैनावतीवर त्याचे अतिशय प्रेम आहे. आणि ती भानगड नसून भानगड आणि प्रेम यांच्यामधलं लव असल्याचं तो मैनावतीस सांगतो.

हवालदाराची ईश्वरावर लवचिक श्रद्धा आहे. कारण आपली इच्छा पूर्ण झाली तरच परमेश्वर आहे, नाही तर परमेश्वर नाही असे त्याचे मत आहे. त्याला धर्मग्रंथातीलही माहिती आहे. कारण दोघांच्या भानगडीत जो पडतो त्याचा मृत्यू होतो. यासाठी तो धार्मिक ग्रंथातील दाखलेही मैनावतीला देतो. मैनावतीच्या घरी शिपाई कोतवाल मेल्याची खबर घेऊन येतो तेव्हा आपल्या भक्तीत अचाट शक्ती असल्यानेच कोतवाल मेला असे त्याला वाटते. तेथेच तो स्वत:च्या आणि मैनावतीच्या लग्नाच्या तयारीला लागतो आणि उद्याच लग्न करायचं

ठरवतो.

कोतवालाच्या अंत्ययात्रेची तयारी करण्यासाठी मैनावतीच्या घरातून बाहेर पडतो तेव्हा शिपायास कोतवाल, प्रधान, राजा यांच्या मरणानंतर निघणाऱ्या यात्रेस काय म्हणावे यासंबंधी मार्गदर्शन करतो तेव्हा त्यास दरबारी भाषेचे ज्ञान असल्याचे जाणवते. हॉटेलवाल्यास ग्रहण आणि सूतक नसते याचे ज्ञान त्याला आहे यावरून त्याचे समाजाचे अवलोकन चांगले असल्याचे जाणवते. भ्रष्टाचार कसा करावा यातही तो तरबेज आहे. तो शिपायास शिकवायलाही तो कमी करत नाही त्याला कारण याने दहा वर्ष मुन्शीपाल्टीत नोकरी केली आहे.

प्रधानाचा मेव्हणा आप्पासाहेब कोतवाल होणार हे समजल्यावर प्रधानाच्या वशिल्यासमोर तो तात्पुरती माघार घेतो आणि सहा महिन्याच्या आत त्याला खडी फोडायला घालवायचा चंग बांधतो. यावरून तो खुनशी वृत्तीचा असल्याचेही जाणवते.

कोतवालाच्या स्वागतासाठी हवालदार उभा राहतो पण त्याने गेल्या दहा वर्षात परेड केलेली नसते. स्वत:ची स्मरणशक्ती फार चांगली आहे. असा त्याचा गैरसमज आहे. येणाऱ्या नव्या कोतवालालाही परेडमधील काहीच समजत नसल्याचे त्याला माहीत आहे. वेंधळ्या कोतवालास त्याच्या हुद्याची आणि अधिकाराची जाणीव हवालदारच करून देतो. कोतवालाला त्याची कामे समजावून देतो आणि रेडिओवर गाणी ऐकण्यापेक्षा साक्षात बाईसमोर गात असताना गादीवर बसून आपण गाणं ऐकां असा सल्ला देतो. आणि मैनावतीच्या घरी कोतवालाला नेऊन पोहचवतो. तेही मध्यरात्रीनंतर गाणं ऐकण्यासाठी जाण्यामुळे कसं गाणं गोड लागत आणि आपल्या प्रतिष्ठेलाही कसा धक्का बसत नाही हे समजावून सांगतो. येथे तो मुत्सद्दी असल्याचे जाणवते.

कोतवाल मैनावतीच्या घरी येण्याअगोदर मैनावतीच्या घरी जाऊन तिला कोतवालाला कसा आपल्या जाळ्यात ओढायचा हे सांगतो. मैनावतीला सांगून कोतवालाकडून राजाचा कंठा आणि अनेक दागिने चोरायला लावतो पण तरीही राजाच्या हे लक्षात येत नाही हे पाहिल्यावर मैनावतीला सांगून कोतवालास राजाचा छपरी पलंग चोरायला सांगतो. तो पलंग

कोतवालाच्या हुकूमावरून इतर माणसांकडून आणवून घेतो आणि भूताच्या वाड्यात ठेवतो. राजाला प्रधान आणि कोतवाल पटवून देतात की तो पलंग आपल्याच पूर्वजांनी नेला असावा हे पाहताच हवालदार हळूच राजाला पलंग कोतवालाने चोरला असल्याचे सांगतो आणि प्रमाण हवं असल्यास वेशांतर करून उद्या भूताच्या वाड्यात या असे सांगतो. राजाने सामान्य लोकांस किंवा प्रजेस दुर्लक्षित करू नये आणि आपल्या पूर्वजांप्रमाणे आपणही राज्यकारभारात लक्ष घालावे हे राजास सांगतो आणि कोतवालास पकडवून देऊन स्वत: राज्याचा कोतवाल होतो आणि मैनावतीस घेऊन जातो. मैनावती आणि कोतवाल यांच्या अनुषंगाने हवालदाराच्या मनात मानसिक द्वंद्व असल्याचे आढळते तसेच तो स्वभावाने बेरकी, राजकारणी, मुत्सद्दी, धूर्त, भ्रष्टाचारी, महत्वाकांक्षी, विवाहोत्सुक असल्याचे निदर्शनास येते.

**शिपाई -**

राज्याचा कोतवाल मरण पावल्याची खबर घेऊनच शिपाई रंगमंचावर पदार्पण करतो. शिपाई हा हवालदाराच्या हाताखाली दहा वर्ष काम करत असल्याने आणि मराठ्याच्या कुळात जन्माला आल्याने त्याची हवालदारावर अतिशय निष्ठा आहे. तो प्रामाणिकही आहे म्हणूनच राज्याचा कोतवाल मरण पावल्यानंतर सेवाज्येष्ठतेमुळे कोतवालाच्या जागी हवालदाराला बढती मिळणार हे ठाऊक असल्याने तो प्रधानाला कोतवालाच्या रिकाम्या झालेल्या जागेबद्दल विचारतो.

पण त्याला कळते की, हवालदाराच्या जागी प्रधान वशिल्यानं आपला मेव्हणा आप्पासाहेब यास कोतवाल करणार आहे, तेव्हा त्याला वाईट वाटते आणि तो हा सर्व प्रकार हवालदाराच्या कानावर घालायचे ठरवतो. हवालदार आता कुठे असणार याचीही त्याला कल्पना असल्याने तो सरळ मैनावतीच्या घरी जातो आणि सर्व हकीकत हवालदारास सांगतो. जेव्हा हवालदार होणाऱ्या कोतवालास सहा महिन्याच्या आत खडी फोडायला पाठविण्याचा चंग बांधतो तेव्हा शिपाईसुध्दा त्याला साथ देण्याचे वचन देतो. दहा वर्ष शिपाई म्हणून हवालदाराच्या हाताखाली काम करणाऱ्या या निष्ठावंत चाकरास परेड येत नाही त्याला ऑर्डर /हुकूम

माहीत नाहीत, कारण हवालदार जेव्हा त्याला विचारतो

हवालदार : पहिला हुकूम काय रं हाय ?

शिपाई : इस्पिक !

या संवादावरून त्याला पत्त्या खेळण्याचाही नाद असल्याचे दिसून येते.

शिपायास मैनावतीचीही काळजी आहे. हवालदाराच्या गैरहजेरीत त्याला मैनावतीकडे यावेसे वाटते, म्हणजे कोतवाल येणार असल्यास मैनावतीला सावध करतो तसाच तो हवालदारासही सावध करताना आढळतो. शिपाई धूर्त, राजकारणी आणि दूरदृष्टी असल्याचे जाणवते. तो हवालदाराच्या सर्वच चांगल्या आणि वाईट कामात बरोबरीचा भागीदार आहे. अगदी राजाचा छपरी पलंग चोरण्याच्याही कामात तो सहभागी आहे. तशीच तो कोतवालाच्या लग्नातही मदत करायला तयार आहे. एकूण आपल्या वरिष्ठ अधिकाऱ्याशी एकनिष्ठ असणारा तरीही थोडासा चावट शिपाई आपल्यास निदर्शनास येतो.

**मैनावती -**

मैनावती ही एक कलावंतीनं नाच गाणं करून स्वत:च पोट भरणारी आणि राज्याच्या हवालदारावर नितांत प्रेम करणारी व्यक्तिरेखा कलावंतीण असूनही नाचगाण्याचा तिला कंटाळा आला आहे. हवालदाराशी लग्न करण्याची तिची इच्छा आहे. पण कोतवाल झाल्याशिवाय लग्न न करण्याचा हवालदाराचा पण आहे आणि त्याने दोन वर्षे तिला झुलवत ठेवले आहे. राज्याचा विद्यमान कोतवाल मरण पावल्यानंतर त्याच्या जागी हवालदाराचा नंबर न लागता प्रधान आपल्या मेव्हण्याला आप्पासाहेबाला कोतवाल करतो. त्यामुळे मैनावतीच्या अपेक्षांवर गंडांतर येते या नवनियुक्त कोतवालास सहा महिन्यांच्या आत खडी फोडायला पाठवण्याचा चंग हवालदार बांधतो आणि त्याला मैनावतीच्या जाळ्यात अडकवतो. मैनावतीही हवालदाराच्या सांगण्यानुसार कोतवालाकडे हट्ट धरून राजाचे मौल्यवान दागिने, राजदंड आणि शेवटी राजाचा छपरी पलंग मागते. कोतवाल ते सर्व हट्ट पुरवतो पण छपरी पलंग आणल्यानंतर तो मैनावतीच्या घरात घेताना पंचाईत होते कारण मैनावती पलंग न

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

मोडता / कापता आत घ्यायला सांगते आणि घराची चौकटही मोडू देत नाही. अशा अडकित्यात सापडल्याने कोतवाल तो पलंग भूताच्या वाड्यात ठेवायला सांगतो. हा पलंग आणल्यास लग्न करायला ती तयार होणार असल्याने कोतवालही हा सर्व खटाटोप करतो. दुसऱ्याच दिवशी कोतवालाशी लग्न लावावे लागणार असल्याने ती शिताफीने स्वत:ऐवजी स्वत:च्या घराचा हरकाम्या सख्या (छक्का) याला वधूवेशात कोतवालाच्या लग्नमंडपात पाठवते आणि चतुरपणे स्वत:ऐवजी त्याचे लग्न कोतवालाशी लावून देते.

वगनाट्याची नायिका, चतुर स्त्री, नृत्यगायनात कुशल, रूपवान, एकनिष्ठ प्रेम करणारी प्रेमिका, स्वत:च्या मोहपाशात परपुरूषाला अडकवणारी स्त्री असे व्यक्तिमत्वाचे विविध पैलू दर्शवणारी स्त्री म्हणून मैनावती आपल्यासमोर येते.

**कोतवाल -**

सूर्यपूर नगराचा आजारी असणारा कोतवाल मरण पावल्यानंतर राज्याचा प्रधान आपल्या खुळप्या, वेडपट, म्हशी आणि बकऱ्यांमागे रानात आयुष्य घालविलेल्या मेव्हण्याला म्हणजेच आप्पासाहेबास वशिल्याने कोतवाल बनवतो. वास्तविक या पदावर सेवाज्येष्ठतेने हवालदाराचा हक्क असतो. त्यामुळे हवालदार नवनियुक्त कोतवालास सहा महिन्याच्या आत खडी फोडायला पाठविण्याचा चंग बांधतो.

योगयोगाने हा कोतवाल हजर होताच हवालदाराकडे 'रेडू' म्हणजेच रेडिओची मागणी करतो आणि हवालदार त्याला रेडिओवर गाणे ऐकण्यापेक्षा प्रत्यक्ष बाईसमोर गात असताना गादीवर बसून गाणं ऐकायचं असतं ते सुध्दा मध्यरात्र उलटून गेल्यावर असे सांगतो आणि कोतवालाला मैनावतीच्या भजनी लावतो. हा कोतवाल पूर्णपणे वेंधळा आणि बावळट असल्याने त्याला परेडबद्दलही काहीच माहिती नाही. कोतवाल हवालदार आणि शिपाई यांच्यातील वरील अधिकारी कोण? हे तो हवालदारास आणि शिपायास विचारतो. सुरवातीला हवालदारास हवालदासाहेब आणि शिपायास शिपाईसाहेब म्हणून संबोधतो.

मैनावतीच्या हट्टापाई कोतवाल राजाचे अनेक दागिने, राजदंड चोरून आणून मैनावतीस

देतो पण मैनावती मात्र हवालदाराच्या सांगण्यावरून कोतवालास पदच्यूत करण्यासाठी हे जाळे विणत असते. शेवटी हवालदाराच्या सांगण्यावरूनच मैनावती कोतवालास राजाचा छपरी पलंग आणून दिलास तरच तुझ्याशी लग्न करेन ही अट ठेवते. त्यामुळे कोतवाल राजाचा छपरी पलंग हवालदाराकडून चोरी करून आणून देतो. पण तो तिच्या घरात येत नसल्याने भूताच्या वाड्यात ठेवावा लागतो.

राजाला छपरी पलंग त्यांच्या पूर्वजांनी किंवा वडिलांनी नेला असावा असे पटवून देण्यातही कोतवाल यशस्वी होतो पण हवालदारामुळे राजा वेष बदलून भटजीच्या वेषात येतो आणि वेषांतर करुन आलेल्या राजापुढे स्वतःच्या चोरीची कबुली देतो आणि फाशीच्या शिक्षेस पात्र होतो पण त्यापूर्वीच त्याचे लग्न मैनावतीऐवजी सख्यासोबत लावून दिले असल्याने सख्या राजाकडे विनवणी करतो की, 'मला लगीच विधवा करू नका एक वेळ अभयदान द्या..' या विनवणीमुळे क्षत्रिय धर्मानुसार राजा कोतवालास अभय देतो पण नवरीच्या वेशीतील सख्या जेव्हा कोतवालासमोर येतो. तेव्हा कोतवालच महाराजाकडे 'मला फासावर चढवा, हत्तीच्या पायी द्या.... पण हे लफडं नग...' म्हणून विनवणी करतो पण सख्यासोबत संसार करण्याची शिक्षा कोतवालास होते.

एकूण वेडपट स्वभावाचा, हेकेखोर, स्वार्थी, वेंधळा, स्त्री हट्टासाठी काहीही करायला तयार होणारा, स्त्रीलंपट, हवालदाराच्या जाळ्यात अडकणारा असा कोतवाल आपणास पहायला मिळतो. वगनाट्यातील खलनायक म्हणूनही तो आपणा समोर येतो.

**प्रधान -**

सूर्यपूर नगरीचा प्रधान मॅटर्निटीतून सरळ रंगमंचावरील दरबारात हजर होतो. हा प्रधान फक्त भ्रष्टाचारी, आपल्या अधिकाराचा वापर करणारा पण कर्तव्याची मात्र जाण नसणारा, राज्यातील कोणत्याच घडणाऱ्या घटनेची माहिती नसणारा त्याला वंशपरंपरेने प्रधानपद प्राप्त झाले आहे. ते स्वकर्तृत्वाने संपादन केले नसल्याने त्या पदाची त्याला किंमत नाही. राजाच्या अज्ञानाचा आणि अकार्यक्षमतेचा तो पुरेपूर फायदा उचलतो. राज्याचा कोतवाल आजारी

असल्याची बातमीही तो कोतवाल मरणाच्या दारात उभा असताना तो कळवतो. कोतवाल मेल्यानंतर त्याच्या जागी सेवाज्येष्ठतेने हवालदाराचा नंबर अथवा हक्क असतानाही स्वत:च्या पत्नीच्या हट्टापायी तो स्वत:चा वेडपट मेव्हणा आप्पासाहेब याला स्वत:च्या वशिल्याने कोतवाल पदावर आणून बसवतो. वास्तविक त्याची या पदावर येण्याची पात्रता नाही, ही गोष्ट प्रधानालाही माहीत असते पण राज्याचा कोतवाल आपला मेव्हणा असला तर राज्याचा सगळा 'मलिदा' किंवा 'काळा पैसा' आपल्यालाच खाता येईल हा दूषित दृष्टिकोन ठेवून त्याची नेमणूक कोतवाल पदावर केली जाते.

स्वत:च भ्रष्टाचारी असल्याने स्वत:च्या मेव्हण्याच्या मनमानी कारभारावर त्याचे लक्ष नाही. कोतवालाने म्हणजे त्याच्या मेव्हण्याने स्वत: राजाचे अनेक मौल्यवान दागिने चोरले, त्याचा छपरी पलंगही चोरला तरीही प्रधानाला त्यातील काहीही माहीत नाही आणि पलंग चोरल्यानंतर जेव्हा आपला छपरी पलंग चोरला गेल्याचे राजाच्या निदर्शनास येते तेव्हा प्रधान आणि कोतवाल दोघे मिळून पलंग भूताच्या वाड्यात आपल्या स्वर्गवासी वडिलांनीच नेला असावा हे पटवून देतात.

एकूण भ्रष्टाचारी, स्वार्थी, वशिलेबाज, राज्यकारभारातील मलिदा खाण्यात पटाईत, स्वत:च्या पत्नीच्या हट्टापायी आपल्या मेव्हण्याला कोतवाल बनवणारा राज्याचा हितशत्रू, प्रसंगी राजालासुध्दा गंडवण्यात यशस्वी होणारा सूर्यपूर नगरीचा प्रधान आपल्यासमोर येतो.

**राजा -**

'विच्छा माझी पुरी करा' या वगनाट्यातून सूर्यपूर नगरीतील अनागोंदी कारभाराला कारण ठरलेला राजा रणधीर हा भोळाभाबडा राजा म्हणून आपणासमोर येतो. रंगमंचावरील आपल्या दरबारात प्रवेश करताच हवालदाराकडे प्रधानजी आणि दरबारीजन कोठे आहेत याची चौकशी करतो. राजाचा दरबारीजनांवर कसल्याही प्रकारचा वचक नाही हे दिसून येते. राज्यातील चोऱ्या, खून, पाऊसपाणी यासंबंधी राजाला कसलीच माहिती नाही एवढेच काय पण राज्याचा कोतवाल अत्यवस्थ आहे याचीही माहिती राजाला नाही. कायमस्वरूपी

शिकारीच्याच नादात असणाऱ्या या राजाने स्वतःच्या राज्यात संततीनियमनाचा कायदा मात्र केलेला आहे. इतर देशातील लोक आपल्या राज्यात येऊन श्रीमंत होत आहेत पण प्रजेचा मात्र आर्थिक विकास होत नाही याचे त्याला सोयरसुतक नाही. राज्यकारभार योग्य पद्धतीने करण्यापेक्षा शिकारीत रमणारा हा राजा शिकारीतही पारंगत नाही. जेव्हा त्याला समजते राज्याचा कोतवाल मरण पावला आहे तेव्हा तो सांत्वन करण्यासाठी कोतवालाच्या घरी न जाता शोक व्यक्त करण्यासाठी जनानखान्यात जातो. यावरून तो स्वतःच्या कर्तव्यात कुचराई करणारा राजा आहे हे दिसून येते.

आपल्या राज्यात सेवकांची नियुक्ती करत असताना त्यांची कसलीही परीक्षा, चाचणी, चाचपणी तो करत नाही, किंबहुना ते सर्व अधिकार त्याने स्वतःच्या प्रधानास देऊन ठेवले आहेत. होणाऱ्या नेमणुकांवर त्याचा कसलाही अंकुश नाही, स्वतःच्या राज्यात चालणाऱ्या वशिलेबाजीची त्याला कल्पना नाही.

राज्य प्रशासनावर त्याचे अजिबात लक्ष नाहीच नाही पण स्वतःच्या मौल्यवान वस्तू व दागिन्यावरही त्याचे लक्ष नाही. नवनियुक्त कोतलवाकडून स्वतःचे अनेक दागिने चोरले जातात. राजदंड चोरला जातो, त्याची राजाला खबर नाही जेव्हा स्वतःच्या छपरी पलंग चोरी होतो तेव्हा मात्र त्याला खडबडून जाग येते आणि यासंबंधी प्रधान, कोतवाल, हवालदार, शिपाई यांना जाब विचारतो पण तो छपरी पलंग आपल्या दिवंगत वडिलांच्या भूताने वाड्यात नेला असेल असे प्रधान आणि कोतवाल सुचवतात तेव्हा तो ते मान्य करतो आणि नवीन पलंग बनवण्याची हुकूम देतो. येथे तो अंधश्रध्दाळू असल्याचे लक्षात येते. पण जेव्हा हवालदार सत्य सांगण्याचा प्रयत्न करतो, तेव्हा तो हवालदाराशी सामान्य माणूस म्हणून बोलण्यास नकार देतो. हवालदार त्याला समजावतो की, राजा जर सामान्य प्रजेला विसरला तर सत्यानाश होईल तेव्हा राजा हवालदाराचे म्हणणे ऐकतो. त्याला कोतवालाच्या कारभारावर संशय येऊ लागतो आणि कोतवालाच्या चोरीचे प्रमाण / पुरावा पाहण्यासाठी वेषांतर करून भूताच्या वाड्यात जातो.

भटजीच्या वेषात आलेल्या राजाला कोतवाल ओळखत नाही. राजा कोतवालाचे लग्न लावून देतो आणि हवालदाराने सांगितल्याप्रमाणे 'मैनावतीसारखी देखणी नृत्यगायनात कुशल स्त्री कशी मिळवतीस' असे कोतवालास विचारतो. कोतवाल झालेला सर्व प्रकार अभिमानाने सांगतो आणि राजाला प्रमाण किंवा पुरावा मिळतो. राजा कोतवालास फाशी देण्याचा हुकूम देतो पण सख्याच्या विनवणीमुळे त्याला अभय देऊन सख्यासोबत संसार करण्याची शिक्षा देतो. हवालदारास कोतवालपद बहाल करतो आणि मैनावती आणि हवालदारास (कोतवालास) आशीर्वाद देतो.

एकूण सुरवातीस वेंधळा, भोळा भाबडा, राज्यकारभारात लक्ष नसणारा, शिकारीचा छंद असणारा पण त्यातही पारंगत नसणारा प्रधानावरच राज्यकारभार सोपवणारा, अंधश्रध्दाळू असणारा राजा वगनाट्याच्या शेवटी मात्र यशस्वी वेशांतर करणारा, ठोस निर्णय घेणारा कोतवालास शिक्षा देणारा प्रजाहितदक्ष राजा पहावयास मिळतो.

**सख्या -**

कलावंतीणींच्या घराच्या परंपरेला अनुसरून घरचा हरकाम्या म्हणून सख्या हा तृतीयपंथी इसम वगनाट्यात वावरताना आढळतो. या हिजड्यास किंवा छक्क्यास आपलेही लग्न व्हावे आपणही संसार करावा असे वाटते. या अनावर ओढीतून तो हवालदारास धनी म्हणून संबोधतो. या अनावर ओढीची पूर्तता वगनाट्याच्या शेवटी होते. मैनावती स्वत:च्या जागी सख्याला वधूवेशात लग्नमंडपात पाठवून त्याचे लग्न कोतवालाशी लावून देते. कोतवालाच्या अक्षम्य अपराधाबद्दल राजा त्याला फाशीची शिक्षा देतो, तेव्हा सख्याच राजाकडे स्वत:च्या विधवापणाचे साकडे घालतो आणि राजा कोतवालास सख्यासोबत संसार करण्याची शिक्षा देतो. कोतवालास मात्र सख्यासोबतच्या संसारापेक्षा मृत्यूदंडच प्रिय असतो एकूणच अपेक्षित आणि पदोपदी संभावना सहन करायला लागणारी तरीही ती हसत-हसत सहन करणारी ही व्यक्तिरेखा आहे.

सारांशाने 'विच्छा माझी पुरी करा' या वगनाट्यात हवालदार, कोतवाल, प्रधान,

राजा, शिपाई, मैनावती, सख्या अशा व्यक्तिरेखा वावरताना आढळतात. हवालदार आणि मैनावती ही नायक-नायिकेची जोडी तर कोतवाल आणि प्रधान हे खलपुरूष म्हणून आपणासमोर येतात. पात्रांच्या परस्पर संबंधातून आणि संवादातून वगनाट्याचे कथानक गती घेते. व्यक्तिरेखांच्या अनुषंगाने वगनाट्यातील घटना प्रसंग आकारास येतात. व्यक्तिरेखा आणि कथानक हातात हात गुंफून चालत असल्याने हे वगनाट्य यशस्वी झाले आहे हे निर्विवाद सत्य आहे.

## ड) रसनिर्मिती-

कथानक/ संविधानक, व्यक्तिरेखा याबरोबरच नाट्यात परिपुष्ट झालेले रस आणि ते कशा पध्दतीने परिपुष्ट होतात हेसुध्दा नाट्याचे महत्वाचे अंग असते. किंबहुना नाट्यात निर्माण झालेल्या रसांशी प्रेक्षक तादात्म्य पावत असतो. प्रेक्षकाला नाट्यातील अनुभव आपल्याच आयुष्यात घडल्याचा क्षणभर भास होतो. म्हणूनच अनेक नाटके पहात असताना अनेक प्रेक्षक भावनाविवश होतात आणि त्यांचे विरेचन घडते. नाट्यात ही रसनिर्मिती होण्यासाठी 'विभावानुभावव्यभिचारीसंयोगाद्रसनिष्पत्ति' या भरताच्या रससूत्राप्रमाणे विभाव, अनुभव आणि संचारीभाव यांचा संयोग व्हावा लागतो आणि त्यातून रसनिर्मिती प्रक्रिया घडते. या प्रक्रियेसाठी विभावानुभावांचे यशायुक्त चित्रण होणे गरजेचे असते. रसनिर्मितीच्या घटकांची म्हणजेच नायक-नायिका हे आलंबनविभाव, त्यांच्या विविध क्रियारूपांनी अभिनयादिकांनी व्यक्त होणारे दृश्य परिणाम सहाय्यक असे संचारीभाव आणि परिणामरूप अनुभाव यांचे कुशलतेने संयोजन झाल्यास रसनिर्मिती होते. कलाकृतीतून जरी अनेक रस परिपुष्ट होत असले तरी कलाकृतीचा एक मुख्य किंवा स्थायी रस असतो आणि संपूर्ण कलाकृतीवर त्याचे निर्विवाद साम्राज्य असते म्हणून तो प्रेक्षकांच्या अभिरूचीच्या कसोटीला उतरतो.

प्रस्तुत 'विच्छा माझी पुरी करा' वसंत सबनीस लिखित वगनाट्य म्हणजे मुळातच

रंजक वगात येणारे वगनाट्य असल्याने त्यात गंभीरता / बोधप्रदता आढळून येत नाही. बतावणीत लेखकाने सांगितल्याप्रमाणे वगनाट्यात अश्लिलता किंवा बिभत्सरस कुठेही आढळत नाही.

संपूर्ण वगनाट्यात हास्यरसाचे निर्विवाद साम्राज्य असल्याचे जाणवते. सुरवातीलाच राजाचे पाय धरून थांबवून नंतर हवालदार त्याना मुजरा करतो. प्रधान मॅटर्निटीत गेलेले आहेत हे सांगताना लक्षणाशक्तीचा वापर करून हास्यरस आणला आहे. राजा हवालदाराकडे चोऱ्या, खून, पाऊसपाणी यासंबंधी चौकशी करतो तेव्हा हवालदाराने दिलेल्या उत्तरातूनही हास्यरस परिपुष्ट होतो. राज्याच्या कोतवालाच्या तब्येतीची चौकशी केली असता 'चिंता करण्याचं काही कारण न्हाई... तब्येतीला मुळीच धोका न्हाई एक वेळ जीव जाईल पर तब्येतीला काइबी व्हायचं नाई' हे हवालदाराने दिलेले उत्तर विरोधाभासातून विनोद निर्माण करते आणि प्रेक्षकाना गुदगुल्या करून जाते. 'ग्रहण आणि सुतक हे हाटिलवाल्या कधी लागत नसतं' या सूचनेवरूनही हास्यरस परिपुष्ट होतो. सहा बाटल्यांच्या सहा डझन बाटल्या कशा करायच्या हे भ्रष्टाचाराचे मूर्तिमंत उदाहरण मुन्शीपालटीतील भ्रष्टाचाराच्या ट्रेनिंगमुळे जमले असल्याने या उपरोधपूर्ण बोलण्यानेही हास्यरस अवतरतो.

नवनियुक्त कोतवालाकडून हवालदार आणि शिपायास हवालदारसाहेब आणि शिपाईसाहेब संबोधले जाणे, रेडिओला रेडू म्हणून संबोधणे, हवालदाराची मैनावतीस सूचना की 'कोतवालाला लांबूनच गार कर नाहीतर तो व्हायचा गरम आणि मी व्हायचो गार' या सूचनेमुळेही हास्यरस अवतरतो. तसेच शिपायाने हवालदारास, हवालदाराने कोतवालास, प्रधानास व राजास आणि कोतवालाने राजास चावटपणे बोलणे संकेतभंग करून जाते आणि हास्यरस निर्माण करते. कोतवालाच्या बावळट वेंधळ्या स्वभावाने, विचित्र पोषाखाने आणि हाल्याऽऽ थिर्ररऽऽ या ललकारीनेही हास्यरस परिपुष्ट होतो.

कोतवालाचे मैनावतीकडे येण जाणे वाढल्याने हवालदाराच्या मनात मानसिक द्वंद्व निर्माण होते. एक प्रकारची अस्वस्थता येथे व्यक्त होते. राजाच्या शिकारीसाठी पॅटन

रणगाड्याचे हवालदाराने केलेले वर्णन विरोधाभासाने युक्त व उपहासपूर्ण असल्याने हास्यरस निर्माण होतो.

कोतवालाचा मृत्यू, हवालदाराची बढती रद्द होणे, कोतवालाचा मैनावतीशी सलगी असे दु:ख प्रसंगही विनोदी पध्दतीने चित्रित करण्यात प्रस्तुत वगनाट्य यशस्वी होते.

याशिवाय मैनावती आणि हवालदार, मैनावती आणि कोतवाल यांच्यातील संवादातून शृंगाररस आला असला तरी, अश्लिलतेच्या कोटीचा तो शृंगार नाही. शुध्द शृंगाररस परिपुष्ट करण्यात लेखक यशस्वी झाला आहे. वेषांतर करून आलेल्या राजासमोर राजालाच कोतवाल अपशब्द वापरतो तेव्हा राजाच्या संवादातून रौद्ररूप उत्पन्न होतो. राजाने दिलेली फाशीची शिक्षा रद्द व्हावी म्हणून कोतवाल आणि वधूवेशातील सख्या राजाकडे विनवणी करतात तेव्हा करूणरस उत्पन्न होतो.

सारांश जरी वगनाट्यात शृंगार, रौद्र, करूण यासारखे प्रासंगिक रस आले असले तरी वगनाट्याचा स्थायी रस हा 'हास्यरस' आहे आणि त्यामुळेच प्रेक्षकांचे निखळ मनोरंजन होते. हा रस अनेक हजरजबाबी संवादातून परिपुष्ट होतो.

## इ) भाषाशैली -

भाषा म्हणजे अनेक शब्दशिल्पांचे स्मारक असते. या स्मारकातील शिल्पे म्हणजेच शब्द हे शब्द जितके रसाळ, अर्थवाही, प्रासादिक, चपखल आणि वाचकास अथवा श्रोत्यास खिळवून ठेवणारे असतात तितके ते शब्दशिल्पांचे स्मारक म्हणजे ती भाषा दीर्घकाळ स्मरणात राहते. अनेक साहित्यकृतींच्या यशाचे भाषाशैली हे गमक आहे. भाषाशैली ही ज्या त्या लेखकाच्या अथवा कवीच्या व्यक्तिमत्वाचा एक भाग असते. उदा. खांडेकरांची भाषाशैली प्रवाही तरीही सुभाषितसदृश्य वाक्यांनी ओतप्रोत भरलेली आहे त्यामुळे बुध्दीजीवी वाचक त्यांच्या कलाकृती हातातून खाली ठेवत नाहीत.

कथा, कादंबरी, ललित निबंध, कविता या सर्वच वाङ्मय प्रकारात भाषेला

अनन्यसाधारण महत्त्व असते. भाषाशैली हा तर नाटकाचा आत्माच आहे कारण भाषाशैलीच्या जोरावर अनेक नाटके यशस्वी होत असतात. नाट्याची कथावस्तू किंवा संविधानक भाषाशैलीच्या माध्यमातून अभिव्यक्त होत असते. पात्रांच्या तोंडून येणारे अनेक संवाद रसिक प्रेक्षकांच्या चिरकाल स्मरणात राहतात. 'कुसुमाग्रजांच्या' 'नटसम्राट' मधील 'आप्पासाहेब बेलवणकर' हे पात्र त्या पात्राच्या संवादामुळे आणि स्वगतामुळे आजही मराठी माणूस विसरलेला नाही. हे त्या भाषाशैलीचे यश म्हणावे लागेल.

लोकरंगभूमीवरील वगनाट्यात तर भाषाशैलीला अनन्यसाधारण महत्त्व असते कारण वगनाट्याचे संवाद मुळातच लवचिक असतात. बदलत्या काळाचे, घटनांचे, घडामोडींचे संदर्भ ते समर्पक भाषाशैलीत बसवून व्यक्त करावे लागतात. वगनाट्याची भाषाशैली हेच त्या वगनाटयाच्या यशस्वीतेचे गमक असते. कारण चटकदार संवादयुक्त भाषाशैलीमुळेच वगनाट्याचे हजारो प्रेक्षक स्वत:चे तन, मन आणि धन अर्पून प्राण कानात आणि डोक्यात आणून वगनाट्याचा आस्वाद घेत असतात. संवादातील द्व्यर्थी शब्द त्या शब्दातून निघणारा वेगळाच अर्थ पात्रांच्या तोंडचे आगाऊ किंवा चावट संवाद या संवादाची आणि शब्दांची नजाकत अनुभवण्यासाठी मराठी माणूस वगनाट्याकडे खेचला जातो. म्हणून लोकरंगभूमीवर वगनाट्य लोकप्रिय होण्यामध्ये प्रभावी भाषाशैलीला अत्यंत महत्त्व आहे.

प्रस्तुत 'विच्छा माझी पुरी करा' वगनाट्य मराठी लोकरंगभूमीवरील अतिशय यशस्वी लोकनाट्य आहे. यातील संविधानक अथवा कथावस्तू यशस्वी भूमिका साकारणारे नट व वगनाट्याची भाषाशैली या सर्व गोष्टींना अनन्यसाधारण महत्त्व आहे. वगनाट्यातील व्यक्तिरेखा जनसामान्यांची भाषा बोलतात. कधी प्रमाणभाषा तर कधी त्याच भाषेत कधी ग्रामीण शब्दही येतात. विशिष्ट गती असणारी भाषाशैली प्रेक्षकांना खिळवून ठेवते. उदाहरणादाखल राजा हवालदारास राज्याच्या सद्यस्थितीबद्दल विचारपूस करत असतो तेव्हा.

राजा : पाऊसपाणी ?

हवालदार : त्यो बी आपल्या कायद्याबाहेर न्हाई... पावसाला ताकीदच हाय

आपली याचं आसल तर पाणी घिऊनच याचं... निस्त याचं न्हाई.. त्या परमाणं पाऊस पाणी घिऊन येतो....

व्यवहारात असणाऱ्या सामान्य संकेतांचाही वापर विनोदनिर्मितीसाठी केला आहे. उदा. कोण मेले म्हणजे काय म्हणतात या संबंधी संवाद

हवालदार : आता परधानजी म्हंजी कोतवालाचा वरचा अधिकारी... तवा परधानजी मेलं तर त्याला म्हनायचं अंत्यदर्शन...

शिपाई : अन् महाराज मेलं तर ?

हवालदार : हां...म्हंजी शंका ?.... वरिष्ठ अधिकारी या नात्यानं तुझ्याचा शंकेचं निरसन करणं हे माझं कर्तव्य आहे.. आता म्हाराज म्हंजी सर्वांच्या वर... त्यांच्यावर कुनीच न्हाई... तवा म्हाराज मेलं तर गाढवा, म्हाराज मेलं म्हनायचं न्हाई... म्हाराज निवर्तले... म्हाराज निवर्तले तर त्याला म्हनायचं महानिर्वाण.. हं आता सांग परधानजी मेले तर काय म्हनायचं ?

शिपाई : अंत्यदर्शन !

हवालदार : शाब्बास ! म्हाराज मेलं तर ?

शिपाई : महानिर्वाण

हवालदार : मग सांग कोतवाल मेला तर काय म्हनशील ?

शिपाई : प्रेतयात्रा

तर प्रधान आपल्या मेव्हण्याबद्दल शिपायास माहिती सांगत असतात तेव्हा

प्रधान : चूप... कितीही झालं तर राजघराण्याचं रक्त आहे.. दरबाराचा पिंड आहे.

शिपाई : बाराचा पिंड हाय ?

उपरोक्त संवादात 'दरबाराचा' शब्दावर कोटी केलेली आहे. या शब्दातील 'दर' शब्द

विभक्त केल्याने 'बाराचा' शब्द राहतो आणि बेमालूमपणे हास्यरस अवतरतो. हे सुध्दा या भाषाशैलीचे वैशिष्ट्य आहे.

सरकारी खात्यातील भ्रष्टाचाराच्या लकबिंचा एक यशस्वी नमुना फक्त एका अक्षराच्या व पूर्ण विरामाच्या माध्यमातून लेखक व्यक्त करतात तो पुढीलप्रमाणे

हवालदार : मला सांग, मयताला रॉकेल लागणार का न्हाई ?

शिपाई : व्हय लागणारच...

हवालदार : किती लागलं ?

शिपाई : लागतील पाच सहा बाटल्या...

हवालदार : म्हंजी सहा बाटल्या लागतील तर असं लिवायचं की मयतासाठी लागलेल्या रॉकेलच्या बाटल्या सहा अन् त्येच्या म्होर ड लिवायचं असन् टिंब द्याचं...

शिपाई : म्हंजी ?

हवालदार : मंजी सहा डझन... म्हंजी साडेपाच डझनाचा नाश्टा....

अनेक संवादातूनन सबनीसांचे शब्दचातुर्य दिसून येते. साधर्म्यवाचक शब्दांचा चतुरतेने वापर केल्याचे आढळते.

उदा- प्रधानाचा मेव्हणा वशिल्याने कोतवाल होत असतो तेव्हा

हवालदार : मग काय विलाज न्हाई... वशिल्याम्होरं कुनाचं काय बी चालायचं न्हाई... वशिलेबाजी लइ घातुक बाजी हाय... तुला सांगतो जगात तीन बाज्या लइ घातुक हैत... विनोबाजी सोडून.

शिपाई : कंच्या ?

हवालदार : एक म्हणजे वशिलेबाजी, दुसरी ढोंगबाजी आणि तिसरी बुवाबाजी. ह्यापैकीकुठल्याबी बाजीत जो घावला त्याची भाजी...

वरील शब्दरचनेतून प्रेक्षक अंतर्मुखही होतो आणि खळखळून हसतोही. अशा प्रकारे प्रेक्षकाला

हसत हसत बोध घडवूनन आणण्याची शक्ती या रचनेत आहे.

काही संवादातून प्रशासकीय भाषेची खिल्ली उडवलेली आहे. उदा. राजा हवालदारास राज्यातील खुनाचं प्रमाण विचारतो तेव्हा तो अपूर्णकांत उत्तर देतो ते पुढीलप्रमाणे.

हवालदार : दोन पूर्णांक एक दशांक.

राजा : अक्षी गणिताच्या भाषेत बोलतोस की ! आमाला काय बी समजलं न्हाई यात.

हवालदार : ही दरबाराची भाषा हाय. सामान्य माणसाला कळू नये म्हणून दरबारात मुद्दाम हायरग्रेडची भाषा बोलत्यात..

तर प्रसंगपरत्वे हायरग्रेड, मॅटर्निटी, ड्रेस, लोअरग्रेड, ट्रंककॉल, ड्यूटी, मेमोरियल, ऑर्डर, प्रॅक्टिस, डिटेक्टिव अशा इंग्रजी शब्दांचाही अंतर्भाव लेखक करताना आढळतो.

वगनाट्यातील पद्यरचना ही सरळ साध्या कल्पनांनीयुक्त आणि सुबोध झालेली आहे. त्यामध्ये शब्दसौंदर्य व नादमाधुर्य इ. गुण आढळतात. प्रेक्षकांच्या किंवा रसिकांच्या मनाची पकड घेण्याचे सामर्थ्य पद्यरचनेत आढळते. पदांच्या चाली सहज मनात रेंगाळत राहणाऱ्या आणि ओठाने गुणगुणाव्याशा वाटणाऱ्या आहेत म्हणूनच या वगनाट्यातील 'नाही कधी का तुम्हास म्हटलं' किंवा 'झाडाला पिकलाय आंबाट' या लावण्या मराठी रसिकांच्या मनात घर करून बसलेल्या आहेत याशिवाय 'सोडू नका तुम्ही धीर राजसा' ही लावणीही सरळ साधा अर्थ व्यक्त करणारी तरीही रसिकांना तृप्त करणारी अशी आहे. या यमक, उपमा, अनुप्रास, स्वभावोक्ती अलंकारानी युक्त अशा रचना प्रेक्षकांना डोलायला लावतात म्हणूनच यातील अनेक रचनांचा नंतरच्या काळात काही चित्रपटही समावेश झालेला आहे.

प्रसंग सांधण्यासाठी लालित्यपूर्ण 'छक्कड' ही वापरलेली आहेत. प्रसंग समोर घडत नसतानाही फक्त शब्दांच्या माध्यमातून पूर्ण प्रसंगाची अनुभूती देण्यात छक्कडांच्या माध्यमातून वगनाट्यकार यशस्वी झालेला आहे.

सारांशाने वगनाट्याची भाषाशैली विनोदी, प्रासादिक, ओजोगुणयुक्त, वाचकाच्या

अथवा प्रेक्षकांच्या सहज लक्षात येणारी, गतिमान प्रेक्षकांना अथवा वाचकांना आपलीशी वाटणारी, अश्लिलता विरहित व्यवहारी बोली, कृत्रिमताविरहीत, प्रेक्षकांच्या अंत:करणाला जाऊन भिडणारी आणि हसता-हसता बोध घडवून अंतर्मुख करणारी अशी आहे.

## फ) परिणामकारकता -

कोणत्याही साहित्यिकाकडून साहित्यकृतीची निर्मिती ही रसिकांसाठी झालेली असते. अभिव्यक्तीचा आनंद त्याला मिळत असला तरी रसिकांच्या मनावर त्या साहित्यकृतीचा काय परिणाम होतो, ती साहित्यकृती रसिक डोक्यावर घेतात की, तिच्याकडे पाठ फिरवतात यावरच त्या कलाकृतीचे यशापयश अवलंबून असते. लोकरंगभूमीवरील साहित्यकृती तर याबाबतीत फारच संवेदनशील असते आणि वगनाट्य तर रसिकांच्या जिव्हाळ्याचा विषय. कारण मराठी माणसाची तमाशाची भूक भागविण्याचे सामर्थ्य या वगनाट्यात असते. वगनाट्य लोकमानसावर किती परिणाम करते. किती गर्दी खेचते आणि लोकांचे किती काळ मनोरंजन करते यावरच वगनाट्याची यशस्वीता अवलंबून असते. साहित्याच्या अनेक प्रयोजनातील महत्त्वाचे प्रयोजन म्हणजे 'आनंद' आणि हे प्रयोजन प्रेक्षकास प्राप्त करून देते ते वगनाट्य यशस्वी ठरते त्यामुळे प्रेक्षकासोबतच लेखकासही आनंद होत असतो.

वसंत सबनीस यांनी १९९९ साली 'विच्छा माझी..' एक आठवण पर्व हा 'विच्छा माझी पुरी करा' या वगनाट्याशी निगडीत असणाऱ्या आठवणींचा संग्रह प्रकाशित केला. त्यातील पूर्वरंग या लेखात ते म्हणतात, 'विच्छा माझी पुरी करा' चे पर्व माझ्या जीवनाला मानसिकदृष्ट्या समृद्ध करून गेले.'[५] एका लेखकाचे मानसिक जीवन समद्ध होण्यासाठी रसिकांचा फार मोलाचा वाटा असतो. प्रस्तुत वगनाट्याने लोकप्रियतेचा कळस गाठल्यानेच लेखकाला मानसिकदृष्ट्या समृद्ध करू शकले.

मुंबई, पुणे, नागपूर, कोल्हापूर सारख्या शहरी भागाबरोबरच महाराष्ट्रातील ग्रामीण भागानेही 'विच्छा माझी पुरी करा' वर प्रचंड प्रेम केले, उदंड प्रतिसाद दिला. रंगमंचावर

जेव्हा जेव्हा हे वगनाट्य सादर होई तेव्हा ते प्रचंड गर्दी खेचत. ही गर्दी हंशा आणि टाळ्यांचा पाऊस पाडत असे. वगनाट्याच्या बतावणीत लेखक म्हणतो.

लेखक : शाहीर ही मराठी माणसं हैत... ती दुसरं काय बी इसरत्याल पर शिव्या अन् टाळ्या द्याला कधी बी इसराची न्हाईत यवढं ध्यनात ठिवा..

हे लेखकाच्या तोंडचे वाक्य ऐकताच प्रेक्षकांच्या प्रचंड टाळ्यांचा पाऊस प्रयोगाच्या वेळी होत असे. मराठी माणसांच्या स्वभाव वैशिष्ट्यांची नाडी पकडून केलेले हे विधान प्रेक्षकांच्या अंत:करणाला जाऊन भिडते.

वगनाट्यात साकारलेले सरकारी कार्यालयातील भाषा आणि भ्रष्टाचाराचे दर्शन प्रेक्षकांच्या नित्याच्या अनुभवाशी निगडीत असल्याने प्रेक्षकांच्या टाळ्या व हशा प्राप्त करते.

वरचा मेल्याशिवाय खालच्याला बढती न्हाइं... ही हवालदाराची खंत अनेक प्रेक्षकांचीही खंत असल्याने प्रेक्षक हसता हसता अंतर्मुख होतात. त्यांच्या मनाला ही प्रशासन व्यवस्थेवर केलेली टीका पटते.

'विच्छा माझी पुरी करा' चा परिणाम जनमानसांवर इतका जबरदस्त झाला की, त्याची नोंद तत्कालिन दैनिकांनी, साप्ताहिकांनी घेतली. स्वत: बाळासाहेब ठाकरे यांनी 'विच्छा' चा प्रयोग पाहून '१६ जाने. १९६६ च्या अंकात 'खरी करमणूक हवी ना ? वसंत सबनीसांचे ढंगदार 'विच्छा माझी पुरी करा' पहाच. 'शाहीर दादा कोंडक्याची कमाल' या शिर्षकाने परीक्षण लिहिले. तर 'शिवशाहीर' बाबासाहेब पुरंदऱ्यांनी 'साप्ताहिक माणूस' मध्ये लिवन सबनीसांचं, गानं तुका शिंद्याचं अन् बोल्नं दादा कोंडक्याचं-' 'विच्छा माझी पुरी करा.' - पुण्याचं पब्लिक लई खूश झालं. पुढे त्यांनी वगाचे कौतुक करून लिहिले होते की, 'लोकनाट्याला इतक्या वरच्या दर्जाच्या प्रेक्षकांकडून एवढी प्रचंड दाद मिळणे हे ह्या यशाचे गमक आणि लेखक कलावंतांना मार्गदर्शन आहे.' [६] पुण्यातील प्रेक्षक हे प्रचंड चोखंदळ असूनही उच्च वर्गातील प्रेक्षकांपासून थेट रिक्षावाले व हमाल यांच्यापर्यंत 'विच्छा माझी..'

लोकप्रिय झाले होते.

वगनाट्य सादर होत असतानाच संवादातून ज्या ठिकाणी किंवा गावामध्ये प्रयोग सादर होत असेल त्या गावातील किंवा भागातील स्थानिक घटना, घडामोडी, व्यक्ती, संस्था यांचा उल्लेख संवादातून येत असे. या उल्लेखामुळे स्थानिक लोक खूश होत.

'विच्छा माझी पुरी करा' मध्ये अश्लिलता आणि अतिरिक्त फाजिलपणा नसल्याने घरंदाज घराण्यातील स्त्रियासुध्दा या वगनाट्याकडे आकर्षित झाल्या. स्त्रियांच्याही अभिरूचीस उतरणारे हे पहिलेच वगनाट्य किंवा लोकनाट्य होते. असे म्हणावयास काहीच हरकत नाही.

नागपूरच्या धनवटे रंगमंदिरात 'विच्छा माझी पुरी करा' चा अनेक वर्षे होळीला हाऊसफुल्ल खेळ व्हायचा आणि प्रयोगात गुलाल उधळला जायचा इतकी भुरळ नागपूरच्या प्रेक्षकांवर प्रस्तुत वगनाट्याने घातलेली होती.

१९७५ साली 'विच्छा माझी पुरी करा' बंद झाल्यानंतर दोन वर्षांनी लेखकास एका टांगेवाल्याने 'नीटस नेसन कानी बुगडी नथनीमध्ये शुभ्र हिरा' ही बतावणीतील ओळ चालीवर म्हणून दाखविली होती. एका बसकंडक्टरनने प्रस्तुत वगनाट्य वसंत सबनिसांनी लिहिले आहे हे कळताच लेखकाला तिकीट काढू दिले नव्हते. वगनाट्य बंद झाल्यानंतर सुमारे दोन वर्षानंतरही रसिक त्यावर प्रचंड प्रेम करत होते हे वरील उदाहरणावरून दिसून येते.

आशा भोसले सारख्या रसिक कलावंताच्या मनाला 'विच्छा माझी पुरी करा' इतके भावले की, त्यांनी 'विच्छा' तील कलावंतांच्या सत्कारासाठी खास प्रयोग आयोजित केला. २० ऑक्टोबर १९६७ रोजी झालेल्या या प्रयोगासाठी अध्यक्ष म्हणून बाबासाहेब पुरंदरे यांना आमंत्रित केले होते. आणि त्यांच्या हस्ते वसंत सबनीस आणि दादा कोंडके यांना घड्याळ व सोन्याचे ब्रेसलेट देऊन सत्कार केला. बाबासाहेबांनी कलावंतांचे भरभरून कौतुक केले. जगातील कोणत्याच रंगभूमीवरील कोणत्याच नाट्याचे एका रसिकाने एवढे प्रचंड कौतुक केले नसेल.

'विच्छा माझी पुरी करा' या वगनाट्याला एवढे प्रेम करणारा रसिक प्रेक्षक मिळाला.

त्या प्रेक्षकांच्या अंत:करणात कायमस्वरूपी घर करून बसणारे मराठी लोकरंगभूमीवरील अद्वितीय वगनाट्य म्हणून 'विच्छा माझी पुरी करा' चा उल्लेख केला तर तो मुळीच वावगे ठरणार नाही.

## ग) विनोद -

जीवनाच्या वेलीवर फुलणारे सुंदर फुल म्हणजे हास्य. पण हे फुल फुलण्यासाठी त्या वेलीला विनोदाचे पाणी घालावे लागते आणि या पाण्याच्या म्हणजेच विनोदाच्या शोधात रसिक असतात. 'लोकनाट्य तमाशा काय आणि सिनेमा काय या सर्वच कला प्रकारांना खेळ म्हणण्याची पद्धत आहे. खेळ मुख्यत: मजेसाठी खेळतात आणि पाहणारेही ती मौज म्हणूनच पाहतात तमाशा ही बहुजन समाजाची मौजच म्हटली पाहिजे. ही मौज लुटण्यासाठीच गावात तमाशा उभा राहिला म्हटले की पोराटोरापासून म्हाताऱ्या कोताऱ्यापर्यंत चौकात / चावडीपुढे एकच झुंबड उडते.'[७]

या तमाशाशौकिनांची रंजनाची भूक भागविण्यात वगनाट्य यशस्वी झाले. मुळात वगाचे 'गंभीर वग' आणि 'रंजक वग' असे दोन प्रकार पडतात पैकी गंभीर वगात विनोदाला गौण स्थान असते तर रंजक वगाचे विनोद हेच सर्वस्व असते. 'या प्रकाराच्या वगाचा हेतू केवळ रंजन करण्याचा असतो. यामध्ये प्रामुख्याने सामाजिक आणि लोककथेवर आधारलेले वग असतात. या वगात घडणाऱ्या घटनात अतिशयोक्ती, असंभाव्यता, कार्यकारणभावाचा अभाव इ. गोष्टी आढळतात. वगाची उभारणी सामान्यत: लोकसंस्कृतीमधील चातुर्यकथेवर केलेली असल्याने कथानक एखाद्या चतुर व्यक्तिभोवती फिरत असते. विनोद निर्माण करण्यासाठी अनेकदा काही वैशिष्ट्यपूर्ण पात्रांची निर्मिती केलेली आढळते. त्यामुळे वगाच्या कथेला विमुक्त स्वरूप प्राप्त होते.'[८]

लोकनाट्यातील संवादाचा लवचिकपणा व उत्स्फूर्तपणा प्रयोगाला रंगत आणतो हा लवचिकपणा रंगमंचावरील इतर कुठल्याही प्रकारात आढळत नाही. नेमके हेच लोकनाट्याचे

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

सामर्थ्य असते पण ते पेलवणारा कलाकार तितक्याच तोलामोलाचा असावा लागतो असे फार थोडे सोंगांडे मराठी तमाशात होते व आहेत. लोकनाट्यातील सामाजिक / राजकीय विनोद हा साधारणत: परिस्थितीजन्य संदर्भावर आधारलेला असतो. बहुतांशवेळी हे संदर्भ सर्वज्ञात असतात. वाक्य कशा पद्धतीने उच्चारले जाते यावरही विनोद अवलंबून असतो.

वसंत सबनीस यांच्या 'विच्छा माझी पुरी करा' या वगनाट्याने तमाम मराठी रसिकांचे मनोरंजन केले, त्यांना सतत हसत ठेवले, ते त्या वगनाट्याच्या विनोदी संवादांनी. मुळातच हा रंजक वगात मोडणारा वग असल्याने विनोद हा त्याचा आत्मा आहे. वगनाट्याच्या बतावणीत लेखक शाहिरास विचारतो -

लेखक : अरं पण काय शोधताय ते तरी सांगा ?

शाहीर : बाई.......

लेखक : बाई... बाबातला बा अन् आईतली ई....

बाई शब्दाची फोड ऐकून प्रेक्षकांच्या हशा आणि टाळ्या पडतात हे वाक्य विशिष्ट पद्धतीने फेकल्याने विनोद निर्माण होतो.

वगनाट्याच्या सुरवातीलाच प्रधानाची चौकशी होते तेव्हा -

राजा : परधानजी कुटं हैत ?

हवालदार : कोन ? परधानजी ? मॅटर्निटीत गेल्यात.

राजा : मॅटर्निटीत कशाला ?

हवालदार : बाळंतपणासाठी म्हाराज.

वास्तविक प्रधान स्वत:च्या पत्नीच्या बाळंतपणासाठी मॅटर्निटीत गेलेला असतो, पण येथे अर्थ विपर्यास होऊन विनोदनिर्मिती होते.

राज्याची हालहवा व कारभार कसा चाललेला आहे याची चौकशी होत असते तेव्हा चोऱ्या, खून यांची विचारपूस झाल्यानंतर पावसाची विचारपूस राजा करतो तेव्हा -

राजा : पाऊसपाणी ?

हवालदार : त्यो बी आपल्या कायद्याबाहेर न्हाई... पावसाला ताकीदच हाय आपली याचं आसल तर पाणी घिऊनच याचं... निस्त याचं न्हाई.. त्यापरमाणं पाऊस पाणी घिऊन येतो..

वरील संवादातून असंबध्दता किंवा विदुषकी विनोद दिसून येतो. वास्तविक पाऊस आणि पाणी वेगळे करता येत नाहीत म्हणून यातून विनोद घडतो.

राज्याची प्रजा वाढवण्याचं काम प्रधानजी कशा प्रकारे करतात आणि त्यांच्यात भरभराट कशी होते यासंबंधी...

हवालदार : म्हंजी विविध प्रकारांनी... म्हंजी महाराज आपलं परधानजी लई डोकेबाज हैत... त्यांनी आपल्या राज्यात लई उद्योगधंदे सुरू केल्यात त्यामुळं इतर देशातले बेकार लोक खुशाल आपल्या राज्यात येतात आन् अशा रितीनं प्रजा वाढते.

राजा : म्हणजे एकूण भरभराट आहे आपल्या राज्याची...

हवालदार : त्ये काय इचारायला हवं ? भाईरचं लोक भरत्यात अन् भराभर श्रीमंत होत्यात... अशी भरमसाट हुतीया..

उपरोक्त संवादातून प्रचलित व्यवस्थेवर उपरोधपूर्ण टीका करून विनोद निर्माण केला आहे.

प्रधान आपल्या मेव्हण्याविषयी शिपायास माहिती देत असतो तेव्हा

प्रधान : चूप. काहीही झालं तरी राजघराण्यातचं रक्त आहे... दरबाराचा पिंड आहे.

शिपाई : बाराचा पिंड हाय ?

प्रस्तुत संवादात दराबाराचा या शब्दावर कोटी करून अर्थविपर्यास केला आहे. आणि विनोद निर्माण केला आहे.

कोतवालाच्या प्रेतयात्रेला जाताना शिपाई भाकरतुकडा खाऊन येण्याचे सांगतो, तेव्हा हवालदार त्याला थांबवतो, रागावतो आणि शेवटी हॉटेलमध्ये नाष्टा करण्यासाठी नेतो

तेव्हा..

हवालदार : लक्षात ठेव.. ग्रहण आणि सुतक हे हाटिलवाल्याला कधी लागत नसतं... किंवा बिल देण्यासंदर्भात

हवालदार : मग लक्षात ठेव. आपली नोकरी टिकवायची असल तर वरिष्ठ अधिकाऱ्याची हाटिलाची बिलं नेहमी कनिष्ट अधिकाऱ्यानच द्याला पाहिजे.

अशा विधानातून प्रचलित परिस्थितीवर व व्यवस्थेवर टीका करून उपरोधपूर्ण विनोदनिर्मिती केली आहे.

कोतवालाचे थिर... थिर... हल्या...ऽऽ करणे तसेच हवालदार आणि शिपायाचे त्याला अनुकरण करणेसुध्दा विनोदनिर्मिती करून जाते. कोतवालाचे रेडिओला रेडू म्हणणे, मैनावतीच्या हरकाम्या सख्याने कोतवालाचे स्वागत करणे या प्रसंगातूनही विनोदनिर्मिती होते.

कोतवालाच्या लग्नप्रसंगी नारळास श्रीफळ, मांजरपाटास अंतरपाट म्हणण्यात संकेताची टर उडवण्यात आली असल्यानेही विनोदनिर्मिती होते. सख्याचे लग्न कोतवालाशी लावून देणे आणि कोतवालाला हे समजताच राजाने त्याची रद्द केलेली मृत्यूची शिक्षा पुन्हा मागणे या प्रसंगातून विनोदनिर्माण होतो. याशिवाय वगनाट्यातील चावट संवादातूनही विनोदनिर्मिती होते.

रंजनप्रधान वगनाट्य असल्याने या वगनाट्यात अनेक प्रसंग विनोदी चित्रित केले आहेत. शाद्बिककोट्या, दृश्य विनोद, श्राव्य विनोद, अर्थ विपर्यासात्मक विनोद, असंबध्दता किंवा विदुषकी विनोद, प्रासंगिक हजरजबाबीपणा, विशिष्ट धाटणी अथवा रंगत यातून निर्माण झालेले विनोद यासारख्या विनोदांनी प्रस्तुत वगनाट्य भरून उरले आहे.

## ह) लोकरंगभूमीवरील स्थान -

पोतराज, डोंबारी, दरवेशी, बहुरूपी, कोल्हाटी, पिंगळे, पांगूळ, नंदीबैलवाले, भाकिते

सांगणारे सरवदे, गोंधळी, भराडी, वासुदेव या सर्व लोककलावंतांनी आपली लोककला दाखवून पूर्वीपासून समाजाचे मनोरंजन आणि प्रबोधन घडवून आणले आहे. लोकरंगभूमीवर या कलावंताना अनन्यसाधारण महत्त्व आहे. त्याच लोकरंगभूमीवर तमाशा हे एक समृद्ध दालन विकसित झाले. त्यातूनच कालांतराने लोकनाट्य आणि लोकनाट्यातून वगनाट्य किंवा मुक्तनाट्य आकारास आले. त्याने लोकरंगभूमीवर स्वत:चे असे एक स्वतंत्र स्थान निर्माण केले. त्याची लोकप्रियता आणि प्रचंड आवाहकता पाहून राष्ट्रसेवा दल, आंबेडकरी चळवळ, सत्यशोधकी समाज यांनी स्वत्वज्ञानाच्या प्रचार आणि प्रसारासाठी उपयोग करून घेतला. आण्णाभाऊ साठे, व्यंकटेश माडगूळकर, शंकर पाटील, द. मा. मिरासदार, आनंद यादव, रा. रं. बोराडे, पु. ल. देशपांडे, यासारखे लेखक आपल्या कसदार लेखणीतून वगनाट्य निर्मिती करीत होते. याच परंपरेत विशेष उल्लेखनीय कार्य करणारे एक नाव म्हणजे वसंत सबनीस तथा रघुनाथ दामोदर सबनीस. यांनी खणखणपूरचा राजा, समदा गाढवाचा गोंधळ, निळावंतीचा वग, बाई बुवा आणि पैज, त्रिशूळाचा वग असे वग लिहिले पण या साऱ्या वगात 'छपरी पलंगाचा वग' हा पुढे 'विच्छा माझी पुरी' करा या नावाने लोकरंगभूमीवर अजरामर झाला. त्याने स्वत:चे असे वेगळे स्थान निर्माण केले.

१९६५ ते १९७५ या काळात 'दादा कोंडके आणि पार्टी' ने केलेल्या प्रयोगांना अपूर्व प्रतिसाद मिळाला. त्या काळात सतत दहा वर्षे त्या वेळच्या हशा-टाळ्यांचे आवाज आजही स्मरणातून गेले नाहीत. अशी आठवण वसंत सबनिसांनी व्यक्त केली.

नाट्य सृष्टीत कॉन्ट्रॅक्ट प्रयोग येणे म्हणजे प्रयोग लोकप्रिय होणे असा अर्थ होतो. या वगनाट्याला काँट्रॅक्टचे प्रयोग घेण्यासाठी अनेक काँट्रॅक्टर पाठीमागे लागत असत. मार्मिक, केसरी, माणूस यासारख्या साप्ताहिक आणि दैनिकांनी विच्छाची दखल घेऊन लेख लिहिले हे लेख शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे आणि शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांसारख्या जाणकार व्यक्तिंनी लिहिले होते.

नाटकाचा प्रेक्षकवर्ग वेगळा आणि तमाशाचा प्रेक्षकवर्ग वेगळा या दोहोंच्यामध्ये

असणारी जागा पटकवण्यात 'विच्छा माझी पुरी करा' हे वगनाट्य यशस्वी टरले. त्यामुळे या वगनाट्यास नाटक आणि तमाशा या दोन्हींचा प्रेक्षकवर्ग मिळाला. पुण्यात झालेल्या दुसऱ्या प्रयोगापासून 'विच्छा माझी...' उसळली आणि पुढे दोन-तीन वर्षात पुण्यातला १५० वा हाऊसफुल्ल प्रयोग साजरा झाला. प्रेक्षकांमध्ये आठ-आठ, दहा-दहा प्रयोग पाहणारे लोक होते. काही वेळा भरत नाट्यमंदिर इतके तुडुंब भरलेले असे की स्टेजवरसुध्दा दोन्ही बाजूस प्रेक्षक दाटीवाटीने बसत. पुण्यातील उच्चवर्गातील प्रेक्षकांपासून थेट रिक्षावाले व हमाल यांच्यापर्यंत 'विच्छा माझी पुरी करा' लोकप्रिय झाली होती.

१९६७ साली पुण्यात कै. स. अ. शुक्लांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या नाट्यसंमेलनात 'विच्छा माझी पुरी करा' चा खास प्रयोग ठेवला होता. नाट्यसंमेलनात प्रयोग सिद्ध करण्याचा मानही या वगनाट्याला मिळाला. ज्या गावामध्ये प्रयोग असेल त्या गावात आधी जाऊन तिथल्या सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक स्थितीचा अभ्यासकरून त्यांचा वापर प्रत्यक्ष प्रयोगावेळी संवादात करायचा त्यामुळे प्रयोगाला रंगत यायची आणि स्थानिक प्रेक्षकही खूश व्हायचे.

'विच्छा माझी पुरी करा' या वगनाट्याने बहुजन समाजावर प्रभुत्त्व गाजवणाऱ्या 'तमाशा' या कलाप्रकारातील अनिष्ट प्रवृत्ती बाजूला सारून त्याला आधुनिक रूप देण्याचा पहिला महत्त्वाचा प्रयत्न केला. पारंपारिक तमाशाचा बाज कायम ठेवून कथासूत्र, पात्रे व त्यांच्यातील संबंध, सोंगाड्याचा लवचिक वापर यासह समकालीन वास्तवावर गर्भित भाष्य करणारे हे वगनाट्य होय.'[१]

लोकरंगभूमीवरील वरील पहिले अश्लिलता विरहीत वगनाट्य होण्याचा मान 'विच्छा माझी पुरी करा' या वगनाट्याला मिळाला. घरंदाज घराण्यातील स्त्रियांपासून सामान्य हमालापर्यंत सर्वांच्या अभिरूचीस उतरण्याचे कार्य प्रस्तुत वगनाट्याने केले.

या वगनाट्याने महाराष्ट्रातील रांगड्या मराठी माणसांचे रंजन तर केलेच पण विच्छाचे हैद्राबाद, बडोदा, दिल्ली अशा महाराष्ट्राबाहेरील शहरांमध्ये यशस्वी दौरे झाले. शिवाय

'विच्छा माझी पुरी करा' वगनाट्याचे 'सैया भये कोतवाल' या नावाने हिंदीत भाषांतर तर 'टेम्प्ट मी नॉट' या नावाने इंग्रजी भाषेत भाषांतर झाले. मराठी मातीतला अस्सल तमाशा यापूर्वी इंग्रजी रंगभूमीवर आला नव्हता. 'सैया भये कोतवालचे' सुमारे ५० आणि 'टेम्प्टी नॉट' चे सुमारे ३३ प्रयोग झाले. टेम्प्ट मी नॉट चे इंग्रजी व मराठी वृत्तपत्रांनी चांगले स्वागत केले. त्याबद्दल महाराष्ट्र टाईम्समध्ये 'राष्ट्रीय संगीत नाट्य केंद्राच्या या अभिनव निर्मितीने भारतीय रंगभूमीवरील ब्रेख्तची मिरासदारीच संपुष्टात आली. ॲलिनिएशनला सामावून घेऊनही आपल्या मातीतील लोकनाट्य सामाजिक व राजकीय विधाने किती प्रभावीपणे करू शकते, आणि त्याचबरोबर इप्सितही कसे साध्य करते याचे प्रत्यंतर 'टेम्प्ट मी नॉट' ने भारतीयच नव्हे, तर जागतिक रंगभूमीला आणून दिले' [१०] असा अभिप्राय व्यक्त केला.

बडोदे येथील सयाजी विद्यापीठाच्या नाटक विभागाचे प्रमुख श्री. जगदीश भट यांनी 'विच्छा माझी पुरा करा' चे गुजराती भाषेत भाषांतर करून 'हीरो हवालदार' या नावाने गुजरातेत २०-२५ प्रयोग केले.

मराठीबरोबरच गुजराती, हिंदी, इंग्रजी भाषेत भाषांतरीत होणारे 'विच्छा माझी पुरी करा' हे पहिलेच वगनाट्य असावे.

२४-४-६५ पासून ३०-३-७५ पर्यंत 'दादा कोंडके आणि पार्टी'ने ११८५ प्रयोग त्यानंतर २-८-७८ साली 'पंचमवेद' या संस्थेने २६-५-७९ पर्यंत प्रयोग केले. त्यानंतर पुण्याच्या मनोहर कुलकर्णी व नाना रायरीकर यांनी ७७ प्रयोग केले. १-८-८० पासून ७-३-८६ पर्यत पुन्हा 'पंचमवेद'ने एकूण ३४७ प्रयोग केले. पुन्हा ४-१०-८६ पासून मुंबईच्या 'प्रतिपदा थिएटर्स'ने २७-१०-८७ पर्यंत २३७ प्रयोग ३०-९-८९ पासून २-६-९० पर्यंत 'यशोदीप थिएटर'ने १०५ प्रयोग केले. पुन्हा 'पंचमवेद' संस्थेने १४-५-९२ पासून ३-१-९९ पर्यंत १७० प्रयोग केले. याशिवाय हौशी संस्था, पुण्याचे मेडिकल कॉलेज, कॉलेजची स्नेहसंमेलने, गणेशोत्सव मंडळ, गावातील उत्सव यात मिळून सुमारे २०० प्रयोग झाले.[११]

'विच्छा माझी पुरी करा' हे लोकरंगभूमीवरील एकमेव वगनाट्य आहे की, ज्याला

इतक्या वेळा वेगवेगळ्या संस्थांकडून पुनर्जीवन मिळाले आहे. शिवाय अनेक नाटकांचे विविध संचांनी केलेले प्रयोग हजार वा पाच हजार झाले असतील, पण एकाच संचात सलग ११८५ प्रयोग करणारे लोकरंगभूमीवरील 'विच्छा माझी पुरी करा' हे एकमेव वगनाट्य आहे.

'प्रचलित परिस्थितीवर मार्मिक टिप्पणी करण्याची 'विच्छा माझी पुरी करा' ने सुरू केलेली प्रथा नंतर सामाजिक नाटकांनीही उचलली. पार्टी दौऱ्यावर असताना दौऱ्याच्या रोजच्या गावाची जाहिरात मुंबईच्या वृत्तपत्रात देण्याची प्रथा 'विच्छा माझी पुरी करा' ने सुरू केली. तीही पुढे अन्य नाट्यसंस्थांनी अनुसरली.'[१२]

एकूण लोकरंगभूमीवरील एक अजरामर वगनाट्य ज्याचे प्रयोग आजही चालू आहेत. बदलत्या काळाचे आणि वर्तमान काळात घडणाऱ्या घटनांचे संदर्भ घेऊन संवादात लवचिकपणा आणून आजही जनमानसाच्या मनावर अधिराज्य गाजविणारे 'विच्छा माझी पुरी करा' हे अद्वितीय वगनाट्य होय.

सारांश, वसंत सबनीस यांच्या 'वीणा' मासिकांतून 'छपरी पलंगाचा वग' या नावाने प्रसिद्ध झालेल्या आणि 'विच्छा माझी पुरी करा' या नावाने लोकरंगभूमीवर अजरामर झालेल्या वगनाट्याने समस्त रसिक प्रेक्षकांच्या मनामध्ये स्वत:चे असे वेगळे स्थान निर्माण केले. वगनाट्यातील बतावणीतून आदर्श लोकनाट्य संकल्पना स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला तर नंतर घडणाऱ्या वगाने ही संकल्पना सत्यात उतरवली. मराठी माणसांच्या अभिरूचीबरोबरच गुजराथी, इंग्रजी, हिंदी भाषिकांच्या अभिरूचीही भूक भागवली. कथानकात हवालदाराला योग्य न्याय देऊन, कोतवालास हिजड्यासोबत संसार करण्याची योग्य शिक्षा दिली. शाब्दिक, कोटीबाज, प्रसंगनिष्ठ विनोदाने रसिकांना हास्यरसात न्हाऊ घातले. लोकनाट्य या कलाप्रकाराकडे प्रेक्षकांचा पाहण्याचा दृष्टिकोन बदलला. बहुजन समाजावर प्रभुत्त्व गाजवणाऱ्या तमाशातील अनिष्ट रूढी, प्रथा, परंपरांना तसेच अश्लिलतेला बाजूला सारून स्त्रीवर्गालाही आकर्षित करण्याचे महत्त्वाचे कार्य 'विच्छा माझी पुरी करा' या वगनाट्याने केले.

मराठी चित्रपटसृष्टीला दादा कोंडके, राम नगरकर यासारखे दिग्गज कलावंत याच

वगनाट्याने दिले. प्रचलित समाज व्यवस्थेवर टिप्पणी करण्याची प्रथा सुरू करून समाजातील विसंगत वर्तन रंगभूमीवर आणले. समाजातील अनेक ज्वलंत प्रश्नावर भाष्य केले. प्रेक्षकांना चिमटे काढूनही त्यांच्या मनामध्ये वेगळे स्थान निर्माण करण्यात प्रस्तुत वगनाट्य यशस्वी झाले.

******

## संदर्भ


१) 'विच्छा माझी पुरी करा'. ले. वसंत सबनीस,
कॉन्टीनेन्टल प्रकाशन, पुणे. चौथी आवृत्ती - १९८६. प्रस्तावना.

२) विच्छा माझी एक आठवण पर्व. ले. वसंत सबनीस,
परचुरे प्रकाशन मंदिर, पुणे. प्रथम आवृत्ती - नोव्हें. १९९९. पृ. १०.

३) एकटा जीव दुसरी आवृत्ती मे १९९९ मॅजेस्टिक प्रकाशन,
'विच्छा' ची सुरवात पृष्ठ ५३.

४) उनि. पृ. ३७

५) विच्छा माझी एक आठवण पर्व. ले. वसंत सबनीस,
परचुरे प्रकाशन मंदिर, पुणे. प्रथम आवृत्ती - नोव्हें. १९९९. पृ. ९.

६) तत्रैव. पृ. ४२

७) मराठीचे लोकनाट्य : तमाशा कला आणि साहित्य.
ले. नामदेव व्हटकर, आवृत्ती डिसेंबर २००९. पृ. ७७ .

८) शाहिरी वाङ्मयाच्या धारा - ले. विश्वनाथ शिंदे.
प्रतिमा प्रकाशन, पुणे. प्रथम आवृत्ती - १९९६. पृ. ८५.

९) संक्षिप्त मराठी वाङ्मय कोष १९२०-२००३ पर्यंत.
संपा - प्रभा गणोरकर, उषा टाकळकर, वसंत आबाजी डहाके,
जया दडकर, सदानंद भटकळ. पृ. ६६०

१०) म. टा. १८-३-९३

११) विच्छा माझी एक आठवण पर्व. ले. वसंत सबनीस,
परचुरे प्रकाशन मंदिर, पुणे. प्रथम आवृत्ती - नोव्हें. १९९९. पृ.१०३ ते १०५.

१२) तत्रैव. पृ. १११


******